सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
RNI No. - MAHMAR 2023/84526
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १२२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ५ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## बंगळुरू चेंगराचेंगरी, सर्व ११ मृतांचे वय ३५ पेक्षा कमी 3 टीनएजर होते ; हायकोर्टाने घटनेची दखल घेतली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५बंगळुरू**

पहिल्यांदाच आयपीएल जिंकणाऱ्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाचा उत्सव बुधवारी मोठ्या अपघातात बदलला. चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर विजेत्या खेळाडूंचे स्वागत करण्यासाठी जमलेल्या गर्दीत चेंगराचेंगरी होऊन ११ जणांचा मृत्यू झाला. ३३ जण जखमी झाले आहेत. सर्व मृत ३५ वर्षांपेक्षा कमी वयाचे होते, तर ३ किशोरवयीन आहेत.




त्याच वेळी, कर्नाटक उच्च न्यायालयाने या घटनेची दखल घेतली आहे. न्यायालय दुपारी २.३० वाजता या प्रकरणाची सुनावणी करणार आहे. त्याच वेळी, सामाजिक कार्यकर्ते स्नेहमयी कृष्णा यांनी क्यूबन पार्क पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत मुख्यमंत्री सिद्धरामय्या, उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार आणि कर्नाटक क्रिकेट बोर्डावर निष्काळजीपणाचा आरोप करण्यात आला आहे.

कालच्या घटनेनंतर संध्याकाळी पत्रकार परिषद घेताना मुख्यमंत्री सिद्धरामय्या म्हणाले, 'मी या घटनेचा बचाव करत नाही, परंतु देशात यापूर्वीही अनेक मोठे अपघात घडले आहेत, जसे की कुंभमेळ्यात ५०-६० जणांना आपला जीव गमवावा लागला. तथापि, याचा अर्थ असा नाही की आपण जबाबदारी टाळावी.' त्याचवेळी, भाजपने त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

**जखमींना रुग्णालयातून डिस्चार्ज**

बंगळुरू चेंगराचेंगरी दुर्घटनेतील बहुतेक जखमींना बोअरिंग आणि लेडी कर्झन रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. रुग्णालयात दाखल असलेल्या १० रुग्णांपैकी फक्त दोघांवर अजूनही उपचार सुरू आहेत. चिन्नास्वामी स्टेडियममध्ये झालेल्या चेंगराचेंगरीनंतर रुग्णालयात एकूण १८ रुग्णांवर उपचार करण्यात आल्याचे वैद्यकीय अधीक्षक टी केम्पाराजू यांनी सांगितले.

**आरसीबी व्यवस्थापनाचीही चौकशी सुरू**

बंगळुरू घटनेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) च्या व्यवस्थापनाचीही चौकशी सुरू आहे. खरं तर, एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या चेंगराचेंगरीच्या काही तास आधी आरसीबीच्या सोशल मीडिया अकाउंटवरून विजयी मिरवणूक जाहीर करण्यात आली होती.

दुसरीकडे, कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन (केएससीए) च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेचीही चौकशी केली जाईल. कर्नाटक पोलिस आणि मॅजिस्ट्रेट अ‍ॅक्रियन पॅनेल याची चौकशी करतील.

## गडचिरोलीतील सुरजागड बनणार देशातील पहिली प्रदूषणरहित 'ग्रीन माइन'

### ३ लाखांहून अधिक रोपांची लागवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५गडचिरोली**

एटापल्ली येथील सुरजागड लोहउत्खनन प्रकल्प देशातील पहिला ग्रीन माइन बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. खाणकामांमध्ये प्रत्येक टप्प्यांवर कार्बन फुटप्रिंट कमी करण्यासाठी प्रदूषणरहित यंत्रसामग्रीचा वापर केला जात असल्याची माहिती पर्यावरण दिनाच्या पूर्वसंध्येला लॉयडस् मेटल्स् अ‍ॅड एनर्जी लि. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन यांनी दिली.

यापूर्वी सूरजागड लोहखनिज खाणीने कार्बन डायऑक्साईड उत्सर्जनात दरवर्षी ३२ हजार टन इतकी लक्षणीय घट केली आहे.



अक्षय ऊर्जा स्रोतांआधारे ही बचत दरवर्षी सुमारे ५० हजार टनांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. हरित वाहनांचा (भारत इलेक्ट्रिक वाहने) ताफा ३४ वरून ५६ इतका वाढला आहे, ज्यामुळे वायू प्रदूषण आणि हरितगृह वायू उत्सर्जन आणि इंधन आयातीवरील अवलंबित्व लक्षणीयरीत्या कमी होते. २०२५-२६ मध्ये, एलएमईएल १०० हून अधिक इलेक्ट्रिक वाहनांचा ताफा असणारी भारतातील पहिली खाण आहे. विद्युत-चालित कंप्रेसरचा अवलंब करून डिझेल-मुक्त ड्रिलिंग विकसित केले आहे, ज्यामुळे हाय-स्पीड डिझेलचा वापर मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे.

## पोलिस बापाकडून पोटच्या मुलीवर अत्याचार

### अमरावती शहरातील घटना, बापलेकीच्या नात्याला काळीमा; वर्षभर सुरू होता अत्याचार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

पोलिस वडिलांकडून आपल्या पोटच्या मुलीवर वर्षभर शारीरिक अत्याचार करण्यात आल्याची किळसवाणी घटना अमरावतीत घडली आहे. या घटनेमुळे बापलेकीच्या पवित्र नात्याला काळीमा फासला गेला आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, अमरावती शहरातील राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत हा संतापजनक प्रकार घडला आहे. अत्याचार करणारा नराधम बाप हा पोलिस दलात कार्यरत आहे. पीडित तरुणी २४ वर्षांची आहे. तिच्या तक्रारीनुसार पोलिसांनी आरोपीवर बलात्कार, विनयभंग व इतर कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पीडित तरुणीच्या माहितीनुसार, आरोपीने गत ४ जून रोजी सकाळी ७ वा. तिच्या अंगाला घाणेरडा स्पर्श केला. त्यानंतर तिच्यावर जबरदस्ती



करण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार मागील वर्षभरापासून सुरू होता. अखेर वारंवार होणारा त्रास असह्य झाल्यामुळे पीडित तरुणीने राजापेठ पोलिस ठाणे गाठून पोलिसांपुढे आपबिती कथन केली.

**पीडिता ८ वीत असल्यापासून सुरू होता अत्याचार**

गंभीर गोष्ट म्हणजे पीडित तरुणी २०१५ मध्ये इयत्ता आठवीत होती. त्यावेळी आरोपीने पहिल्यांदा तिच्याशी लैंगिक जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर काही दिवसांनी आईला बाहेरगावी पाठवून आरोपीने तिच्यावर शारीरिक अत्याचार केला. या प्रकाराची माहिती पीडितेने आपल्या आईला सांगितली. पण आरोपीने या दोघींनाही झाल्या प्रकाराची बाहेर वाच्यता केली तर ठार मारण्याची धमकी दिली. त्यामुळे जिवाच्या भितीने या दोघींनी ही गोष्ट कुणालाही सांगितली नाही. पण अखेर पीडितेने हिंमत दाखवून आपल्या आरोपी बापाविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली.या घटनेची माहिती बाहेर पडताच नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. आरोपी बापावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. राजापेठ पोलिसांनी या प्रकरणी कारवाईला सुरूवात केली आहे.

## नागपूर ते मुंबई सुस्साट, मोदींनी केली ओपनिंग तर फडणवीस ठरले फिनिशर

### ७०१ किमीच्या समृद्धी महामार्गावरील ४ थ्या टप्प्याचे लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ मुंबई**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचा लोकार्पण सोहळा आज संपन्न झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्याहस्ते ११ डिसेंबर २०२२ रोजी समृद्धी नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्गाच्या पहिल्या टप्प्यातील कामाचे लोकार्पण करण्यात आले होते. त्यानंतर, महामार्गावरील प्रवासाला सुरुवात झाली. मात्र, पहिल्या टप्प्यातील हा प्रवास ५२० किमीचाच होता. एकूण ७०१ किमीच्या या महामार्गातील उर्वरीत तीन टप्प्यांत काम प्रगतीपथावर असल्याने १८१ किमीचे लोकार्पण बाकी होते. अखेर, आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते समृद्धी महामार्गावरील ४ थ्या




टप्प्याचे नाशिकमधील इगतपुरीत ते आमणे या ७६ किमीच्या महामार्गाचे लोकार्पण झाले. त्यामुळे, ४ टप्प्यांच्या लोकार्पणानंतर ७०१ किमी समृद्धी महामार्ग प्रवाशांसाठी खुला झाला आहे. यापूर्वी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री दादा भुसे यांच्याहस्ते अनुक्रमे २ आणि ३ टप्प्याचे लोकार्पण करण्यात आले होते.

नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गातील इगतपुरी-आमणे या ७६ किमी लांबीच्या ४ थ्या आणि शेवटच्या टप्प्याचे लोकार्पण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह महायुतीतील अनेक मंत्री उपस्थित होते. समृद्धी महामार्गामुळे इगतपुरी ते कसाराचे अंतर अवघ्या ८ मिनिटात गाठता येणार असून ७६ किमीच्या या टप्प्यात एकूण ५ बोगदे आहेत. त्यात, समृद्धी महामार्गावरील सर्वाधिक लांबीचा ८ किलोमीटरचा बोगदा नाशिक जिल्ह्यातील इगतपुरीपासून सुरू होतो.

**७०१ किमी महामार्गाचे ४ टप्प्यात लोकार्पण**

७०१ किलोमीटर लांबीच्या समृद्धी महामार्गातील नागपूर ते शिर्डी दरम्यान ५२० किलोमीटरच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण ११ डिसेंबर २०२२ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले होते, त्यानंतर तो वाहतूक सेवेचा भाग बनला. तर, २६ मे २०२३ रोजी शिर्डी ते भरवीर दरम्यानच्या ८० किलोमीटर लांबीच्या टप्प्याचे लोकार्पण तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. ४ मार्च २०२४ रोजी भरवीर ते इगतपुरी दरम्यानच्या २५ किलोमीटर टप्प्याचे उद्घाटन तत्कालीन सार्वजनिक बांधकाम (उपक्रम) मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते करण्यात आले. या सर्व टप्प्यांमुळे मार्च २०२४ पासून नागपूर ते इगतपुरी या ६२५ किलोमीटरच्या प्रवासाला लक्षणीय गती मिळाली. मात्र, नागपूर ते मुंबई थेट ८ तासांत प्रवास केव्हा शक्य होईल, याकडे सर्वांचे लक्ष लागून होते. त्यासाठी इगतपुरी ते आमणे या ७६ किलोमीटर टप्प्याचा वाहतूक सेवेत समावेश होणे अत्यावश्यक होते. अखेर प्रवाशांची ही प्रतीक्षा संपली असून, गुरुवार ५ जून रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते इगतपुरी येथे या शेवटच्या टप्प्याचे लोकार्पण संपन्न झाले अन् फडणवीसांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या समृद्धी महामार्गाच्या ७०१ किमी वाहतूक सेवेला गती मिळाली.

## समृद्धी महामार्गावरील हायटेक बोगदा, तापमान ६० अंशांच्या वर गेलं तर पाण्याचे फवारे सुरु होणार, डेन्मार्कची टेक्नोलॉजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ मुंबई**

नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावरील इगतपुरी-आमणे या ७६ किमी लांबीच्या शेवटच्या टप्प्याचे लोकार्पण गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले. या उद्घाटनानंतर मुंबई ते नागपूर हा एकूण ७०१ किमीचा समृद्धी महामार्ग पूर्णतः वाहतुकीसाठी खुला झाला आहे. या महामार्गावर देशातील सर्वात मोठा ०८ किमी लांबीचा हायटेक बोगदा उभारण्यात आला आहे. तसेच, वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा समजला जाणारा




सर्वाधिक उंच खांबांवरील पूल, ३२ मोठे पूल, २५ इंटरचेंज आणि ६ किमी लांबीचे ओव्हरपास देखील या महामार्गावर तयार करण्यात आले आहेत.

समृद्धी महामार्गाच्या बोगद्यात डेन्मार्कच्या धर्तीवर स्प्रिंकल्स बसविण्यात आले आहेत. एखाद्या गाडीने पेट घेतला आणि ६० अंशांपेक्षा जास्त तपमान वाढले तर पाण्याचे फवारे सुरु होणार होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वाहन चालवित असताना पाण्याची फवारणी करण्यात आली.

हा हायटेक बोगदा १७.५ मीटर रुंद आणि ९ मीटर उंच असून, यात एकूण तीन लेन आहेत. प्रवासी येथे ताशी १०० किलोमीटर वेगाने सहज प्रवास करू शकतात. बोगद्याच्या भिंतींना पॅसिव्ह फायर प्रोटेक्शन देण्यात आले असून, त्यावर लावण्यात आलेल्या लाइट रिफ्लेक्टिंग पटलांमुळे रस्त्यावर दिव्यांचा लखलखाट निर्माण होतो. दर ३०० मीटर अंतरावर एक अशा प्रकारे एकूण २६ क्रॉस पॅसेज देण्यात आले आहेत. अपघात किंवा आपत्कालीन परिस्थितीत प्रवाशांना या पॅसेजच्या माध्यमातून बोगद्याबाहेर सुरक्षितपणे बाहेर पडता येते.

## दोन भावांनी बोललं पाहिजे त्यांच्याकडे एकमेकांचे नंबर आहेत, ते बोलू शकतात : अमित ठाकरे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

मनसेने पर्यावरण दिनानिमित्त दादर-माहिम विधानसभा मतदार संघात खिळेमुक्त वृक्ष अभियान राबवलं आहे. या अभियानात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे सुपुत्र अमित ठाकरे यांनी सहभाग घेतला होता. यावेळी माध्यमांच्या प्रतिनिधींना प्रतिक्रिया देताना अमित ठाकरेंनी मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेना युतीवरही भाष्य केलं आहे. अशी प्रतिक्रिया दिली आहे.



माझी भूमिका एवढीच आहे की, दोन भावांनी बोललं पाहिजे. आम्ही बोलून काही फरक पडणार नाही. दोन भाऊ एकत्र येण्यात मला काही इश्यू नाही. मी २०१४, २०१७ ला बघितलंय, कोरोना काळातही पाहिलंय, कोरोनात उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते तेव्हा राज साहेबांनी उद्धवजींना पहिला फोन केला होता. हा भीषण आजार आहे. त्यामुळे कोणतंही सरकार असो, आपण साथ दिली पाहिजे असं म्हटलं होतं. त्यांची इच्छा असेल तर त्यांनी फोन करावा. हे मीडियासमोर बोलून किंवा वर्तमानपत्रात बोलून युती होत नाही. त्यांच्याकडे एकमेकांचे नंबर आहेत, ते बोलू शकतात असं अमित ठाकरे यांनी म्हटलं आहे.

## संपादकीय ......

# प्लास्टिकचा एवढा अट्टाहास कशासाठी ?

पाच जून रोजी पाळला जाणारा 'जागतिक पर्यावरण दिन' हा मानवाच्या बदलत्या जीवनशैलीमुळे होणार्या हानीबाबत आणि विकासासाठी होणार्या निसर्गाच्या शोषणाबाबत जगाला इशारा देत आहे, जागृत करत आहे. यंदाच्या पर्यावरण दिनाची थीम प्लास्टिकमुळे पर्यावरणाला होणार्या धोक्यांबाबत जागृती करणारी आहे. दरवर्षी जगभरात ४० कोटी टनांहून अधिक प्लास्टिक तयार होते. त्यातील केवळ १० टक्के पुनर्वापरात येते. उर्वरित प्लास्टिक नदी, समुद्र, जंगल आणि मातीमध्ये मिसळत असून त्यामुळे पृथ्वीवरील जीवसृष्टीचे, निसर्गाचे प्रचंड नुकसान होत आहे.जागतिक पर्यावरण दिनाची सुरुवात १९७२ मध्ये स्टॉकहोम (स्वीडन) येथे झालेल्या पर्यावरण परिषदेपासून झाली. तेव्हापासून दरवर्षी विविध देशांत व वेगळ्या विषयांवर आधारित हा दिन साजरा केला जात आहे. संयुक्त राष्ट्रांनी यंदाच्या पर्यावरण दिनासाठी निवडलेली थीम आहे, 'बीट प्लास्टिक पोल्युशन!' मानवाच्या दैनंदिन जीवनाला व्यापून टाकलेल्या प्लास्टिकने आज पर्यावरणापुढे मोठे आव्हान उभे केले आहे. पूर्वीच्या काळी प्लास्टिकच्या कॅरीबॅगचा वापर केला जात नव्हता. त्या काळात कापडी, कागदी पिशव्या लोक वापरत होते, पण कालांतराने प्लास्टिकच्या पिशव्यांची उपलब्धता वाढली अणि हा एक सोपा पर्याय आहे हे दिसल्यानंतर त्याच्या वापरापेक्षाही जास्त गैरवापर वाढला. प्लास्टिकच्या कॅरी बॅगचा फार मोठा धोका पर्यावरणाला आहे.

आपण एक कागदी पिशवी वापरली तर हा कागद नैसर्गिक पद्धतीने नष्ट होण्यासाठी केवळ पाच आठवडे लागतात. त्याची कुजण्याची प्रक्रिया तत्काळ होते आणि त्यामुळे पर्यावरणाला त्यापासून हानी होत नाही. कापडी पिशव्यांचे कापड नष्ट होण्यासाठी पाच महिने लागतात. ते कापड जमिनीखाली गाडून ठेवले तर पाच महिन्यांनी ते पूर्णपणे कुजते. त्यामुळे पर्यावरणाला त्यापासून नुकसान होत नाही. प्लास्टिक पिशव्यांचे मात्र तसे नाही. सध्या ज्यापासून प्लास्टिकच्या कॅरी बॅग बनवल्या जातात. ते प्लास्टिक नैसर्गिकपणे नष्ट होण्यासाठी निसर्गाला ५०० वर्षांपेक्षा जास्त कालावधी लागतो. त्यामुळे ते नैसर्गिकपणे नष्टच होत नाही.

प्लास्टिकच्या अतिवापरापेक्षा गैरवापरामुळे निसर्गाचे मोठे नुकसान होत आहे. आज प्लास्टिक कॅरीबॅगचा वापर ही गरज वा सोय कमी आणि स्टाईल अधिक बनली आहे. साध्या औषधाच्या गोळ्या घेतल्या तरीसुद्धा लोक दुकानदाराकडे कॅरी बॅग मागतात आणि ती दिली नाही तर जोरजोरात भांडतात देखील. शेवटी दुकानदारही गिर्हाईक टिकवायचे असते म्हणून ते कॅरी बॅग देतात. बरेचदा या कॅरीबॅग इतक्या पातळ असतात की, घरी जाईपर्यंत त्या फाटतात आणि दुसर्या दिवशी त्या कचर्यासोबत उकिरड्यावर जातात. याचा दुष्परिणाम किती मोठ्या प्रमाणावर होतो याचा विचार ना दुकानदार करतात ना ग्राहक !

सध्याच्या परिस्थितीत आपल्याकडे कचर्यामध्ये सर्वात मोठी समस्या आहे ती प्लास्टिकच्या पिशव्यांचीच. या पिशव्यांचा कचरा नष्ट होत नाही, त्यामुळे तो सर्वत्र पसरलेला दिसतो. त्यामुळे इतर अनेकसमस्या निर्माण होताना दिसत आहेत. गटारे साफ करत असताना त्यामध्ये जास्तीत जास्त प्रमाणात प्लास्टिकच्या पिशव्या आणि प्लास्टिकच्या बाटल्याच सापडतात. पावसाळ्यात ही सर्व गटारे तुंबली जातात. थोडासा जरी पाऊस पडला तरी त्यामुळे रस्त्यावर पाणी येणे, वाहतुकीला अडथळा निर्माण होणे, सोसायट्यामध्ये पाणी जाणे हा प्रकार सर्वत्र दिसू लागला आहे. या परिस्थितीला प्लास्टिक आणि त्याचा वारेमाप वापर व टाकाऊ वृत्तीच कारणीभूत आहे. ही समस्या शहरांपुरतीच मर्यादित राहिलेली नाही. आज खेड्यातही प्लास्टिक कचर्यामुळे ओढे, नाले, गटारी तुंबलेली आढळतात.आज मुंबईसारख्या ठिकाणी किंवा समुद्र किनारी असणार्या गावांमध्ये-शहरांमध्ये समुद्राच्या पाण्याचा तळ प्लास्टिकने झाकलेला आहे, इतका प्लास्टिकचा वापर वाढलेला आहे. ही एका भीषण धोक्याला जन्म घालणारी गोष्ट आहे. याचा जीवसृष्टीवर-जलसृष्टीवर अतिशय प्रतिकूल परिणाम होतो. समुद्राच्या, नद्यांमध्ये राहणारे जलचर पाण्यात टाकलेले प्लास्टिक खाऊन नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. हे मृत प्राणी कापल्यानंतर त्यांच्या पोटात प्लास्टिक आढळल्याचे दिसून आले आहे. आपल्याकडे नदीत किंवा समुद्रात निर्माल्य टाकताना तेही प्लास्टिकच्या पिशवीसकट टाकले जाते. घरातील कचराही प्लास्टिकच्या कॅरीबॅगमध्ये बांधून कचरा कुंडीत टाकला जातो. हा कचरा जी जनावरे खातात, त्यांच्या पोटात प्लास्टिक जाते. कोल्हापुरात अशा मोकळ्या गाई किंवा म्हशींच्या पोटातून तीस-चाळीस किलो प्लास्टिकचे कागद काढण्यात आले आहेत. म्हणजे आपल्या गैरवापरामुळे दुसर्याचा जीव जातो आहे याचा विचार माणसाने केला पाहिजे.

आज मानवी जीवनाच्या सर्व गरजांमध्ये प्लास्टिकचा वापर केला जात आहे. पेनामधील रिफिलचे उदाहरण घेतले तर पूर्वी आठ आण्याला सुटी रिफिल मिळत होती. आता ती प्लास्टिकच्या वेस्टनात मिळते. त्यामुळे तिचा आकर्षकपणा वाढला, किंमत वाढली पण पर्यावरणाचे नुकसानही वाढले. कारण रिफिल काढून घेऊन ते प्लास्टिक आवरण टाकून दिले जाते. आपण जे रेडिमेड कपडे विकत घेतो ते प्लास्टिकच्या पिशवीतच असतात. त्यामध्ये कॉलरजवळ, हातोप्यांवर प्लास्टिक लावलेले असते. अशा प्लास्टिकचे काय करायचे हा प्रश्न असतो. वस्तू आकर्षक दिसावी या विक्रीकौशल्याच्या गरजेतून हे सर्व झाले आहे, पण याची खूप मोठी किंमत पर्यावरणाच्या हानीमुळे मोजावी लागत आहे.निसर्ग अभ्यासक म्हणून मी आणखी एका गोष्टीचे निरीक्षण केले आहे. आजूबाजूला वावरणारे पक्षीही आज घरटे बांधताना प्लास्टिक वापरत असल्याचे दिसले आहे. या घरट्यांमध्येही मला प्लास्टिकचे कागद दिसले. म्हणजे नैसर्गिक पक्षी, प्राणीसुद्धा या वापराला तयार झाले की काय, असा प्रश्न निर्माण होतो, पण यामागचे खरे कारण असे आहे की, या पक्ष्यांना ज्या गोष्टी घरटे बांधण्यासाठी आवश्यक आहे, तेच जर उपलब्ध होत नसेल आणि जिथे तिथे प्लास्टिकच दिसत असेल तर त्या पक्ष्यांचाही नाईलाज आहे. बुलबुल, चिमण्या यांच्या घरट्यात प्लास्टिक दिसू लागणे, इथपर्यंत प्लास्टिकचे आक्रमण वाढले असेल तर ते नक्कीच भनायक आहे. प्लास्टिकचा एवढा अट्टाहास कशासाठी याचे उत्तर आपल्याकडे बोकाळत चाललेल्या 'यूज ॲण्ड थ-ो' कल्चरमध्ये आहे. जागतिकीकरणानंतर आलेल्या नवअर्थकारणामध्ये आणि बाजारधिष्ठित अर्थव्यवस्थेमध्ये 'वापरा आणि टाका' ही संस्कृती वेगाने पसरत गेली.

# राज्यात यंदा दहा कोटी वृक्ष लागवड करणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

### हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियानाअंतर्गत वृक्षारोपण लोकचळवळ करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.५ मुंबई**

३राज्यातील वनाच्छदनाची टक्केवारी वाढविण्यासाठी हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानाअंतर्गत यावर्षी राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. पुढील वर्षीही दहा कोटी वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट आहे. वृक्षारोपण ही लोकचळवळ झाली तरच ही मोहीम यशस्वी होईल. त्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करावे, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियान अंतर्गत वृक्ष लागवड मोहिमेसंदर्भात सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, वन मंत्री गणेश नाईक, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव सुजाता सौनिक, अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांच्यासह विविध विभागांचे सचिव, वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण आवश्यक आहे. देशात सर्वाधिक वनाच्छदन वाढविण्यात महाराष्ट्रात अग्रेसर आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील एक पेड माँ के नाम या अभियानात महाराष्ट्राने चांगली कामगिरी केली आहे. राज्यातील ३३ टक्के वनाच्छदनाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी पुढील वीस वर्षे हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र हे अभियान मोहिम स्वरुपात राबविणे आवश्यक आहे. महाराष्ट्राने गेल्या आठ वर्षात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली आहे. यापूर्वी ३३ कोटी व ५० कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट यशस्वीपणे गाठले आहे. त्यामुळे यंदाच्या वर्षीचे उद्दिष्ट नक्कीच पूर्ण करता येईल. वृक्षारोपणात किमान दिड ते तीन वर्षे वयाची रोपे लावण्यात यावीत. लावलेली झाडे टिकतील, वाढतील यासाठी प्रयत्न व्हावेत. तसेच लावलेल्या वृक्षारोपणाची जगण्याची टक्केवारी वाढावी, यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. तसेच यासाठी रिमोट सेन्सिंग, उपग्रह आदी साधनांचाही वापर करून पारदर्शकपणे कामे होण्याकडे लक्ष द्यावे.दहा कोटी वृक्ष लागवड मोहिमेसाठी सर्व विभागानी जागा तसेच दर्जेदार रोपे निश्चित करावीत. वृक्षारोपण मोहिमेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदांनी सहभाग घ्यावा. तसेच सामाजिक संस्थांनाही यामध्ये सहभागी करून घ्यावे. दहा कोटी झाडे लागवडीच्या मोहिमेच्या यशाचे गमक हे चांगली नर्सरी आहे. त्यामुळे उद्दिष्ट पूर्तीसाठी आवश्यक व दर्जेदार रोपे मिळावीत,यासाठी नर्सरी तयार करणे आवश्यक आहे. तसेच खासगी नर्सरीमध्ये चांगली रोपे तयार होतील, याकडे लक्ष द्यावे. प्रादेशिक परिस्थितीनुसार झाडांची लागवड करण्यात यावी. वृक्षारोपण अभियानाच्या कामासाठी 'कॅम्पा'अंतर्गतचा निधीचा पुरेपूर वापर करावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.महामार्गाच्या कडेला झाडे लावण्याची जबाबदारी आता वन विभागाकडे*राज्यातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग तसेच पालखी मार्गाच्या कडेला वृक्षारोपण करण्याच्या कामाची जबाबदारी आता वन विभागाकडे सोपविण्यात येईल.




# केसांमध्ये तेल लावण्याची 'योग्य पद्धत' तुम्हाला माहिती आहे का?

दि.५विदर्भ प्रजासत्ताक १

केस गळती ही आजकाल बहुतेक स्त्रिया आणि पुरुष यांना भेडसावणारी सामान्य समस्या बनली आहे. तणाव, चुकीचा आहार, हार्मोन्स, वंशपरंपरा, हवामान अशा अनेक कारणांमुळे केस गळतात. मात्र नियमित आणि योग्य पद्धतीने तेल लावल्यास ही समस्या खूप अंशी टाळता येते.

केस गळती थांबवण्यासाठी योग्य पद्धतीने केसांना तेल लावण्याची स्टेप बाय स्टेप माहिती:

**१. योग्य तेल निवडा**

**नारळ तेल:** केसांच्या मुळांपर्यंत पोचून मजबूती देतं.

**कॅस्टर तेल (एरंडेल)**: रक्ताभिसरण वाढवून केस वाढीस चालना देतं.

**आर्गन तेल:** अँटिऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन ईने भरलेलं, केसांना चमक आणि मजबूती देतं.

**बदाम तेल:** व्हिटॅमिन डी आणि ई युक्त, केसांची मुळं मजबूत करतं.

**आवळा तेल:** व्हिटॅमिन उ आणि अँटिऑक्सिडंट्समुळे केस गळती कमी करतं आणि केस काळेभोर राहतात.

**२. तेल गरम करा**

थोडं गरम केल्याने तेल स्कॅल्पमध्ये खोलवर शोषलं जातं. पण जास्त गरम केल्यास स्कॅल्पला इजा होऊ शकते. तेल फक्त कोमट असावं.

**३. तेल लावण्याची पद्धत**

केस विभागून बोटांनी किंवा कापसाच्या मदतीने तेल लावा. झपाट्याने गळणाऱ्या भागांवर अधिक लक्ष द्या. सुमारे १०-१५ मिनिटे हलक्या हाताने गोलाकार मसाज करा. यामुळे रक्ताभिसरण वाढतं आणि झोपही चांगली लागते.



नंतर केसांच्या लांबीतही तेल लावा जेणेकरून संपूर्ण केस शाफ्टला पोषण मिळेल.

**४. तेल योग्य वेळ ठेवणं गरजेचं**

साधारणपणे १-२ तास तेल ठेवणं योग्य असतं. अधिक पोषणासाठी रात्रीभरही ठेवू शकता. पण तेलकट स्कॅल्प असलेल्या लोकांनी जास्त वेळ टाळावं.

**५. शॅम्पू आणि स्वच्छ धुणं**

कोमट पाण्याने केस ओले करून सौम्य, सल्फेट फ्री शॅम्पू वापरा. जास्त तेल लावल्यास २-३ वेळा शॅम्पू करावा लागू शकतो. शेवटी केसांना कंडिशनर लावा.

**६. तेल लावणं नियमित ठेवा**

दर आठवड्यात किमान एकदा तेल लावावं. सातत्य ठेवल्यास केस मजबूत, दाट आणि निरोगी बनतात.

**७. डायेट आणि जीवनशैली यावरही लक्ष द्या –** प्रोटीन, लोह, झिंक, व्हिटॅमिन -, उ, ऊ, ए, आणि इ-कॉम्प्लेक्स असलेले पदार्थ खा. पुरेसं पाणी प्या, तणाव कमी करा, व्यायाम आणि पुरेशी झोप घ्या.

# सोयाबीन उत्पादन वाढीसाठी पेरणी अगोदर करायला विसरू नका ह्या १० गोष्टी

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक –**

सोयाबीन पिकाची लागवड सर्व प्रकारच्या जमिनीत करता येते. परंतु, अत्यंत हलक्या जमिनीत अपेक्षित उत्पादन येत नाही. जास्त आम्लयुक्त, क्षारयुक्त, तथा रेताड जमिनीत सोयाबीनचेपीक घेऊ नये.



सोयाबीन पेरणीसाठी जूनचा दुसरा आठवडा ते जुलैचा पहिला आठवडा हा काळ सर्वात योग्य राहील. परंतु सोयाबीनची पेरणी मान्सूनच्या आगमनानंतर, किमान १० सें.मी. (१०० मिमी) पाऊस पडल्यानंतरच करावी.

सोयाबीन उत्पादनात स्थिरतेच्या दृष्टिकोनातून २ ते ३ वर्षातून एकदा आपल्या शेताची खोल नांगरणी करणे फायदेशीर ठरते. ज्या शेतकऱ्यांनी गेल्या एक-दोन वर्षात शेत नांगरले नसेल त्यांनी यावेळी आपल्या शेताची खोल नांगरणी करावी. त्यानंतर, विरुद्ध दिशेने कल्टीव्हेटर चालवून शेत तयार करावे. अन्यथा विरुद्ध दिशेने दोनदा कल्टिव्हेटर चालवून शेत तयार करावे.

शेवटची खुरपणी करण्यापूर्वी शेणखत (१० टन/हेक्टर) किंवा कोंबडी खत (२.५ टन/हेक्टर) शेतात टाकून चांगले मिसळावे, त्यामुळे जमिनीची गुणवत्ता आणि पोषकतत्त्वे वाढतात.

उपलब्धतेनुसार, सब-सॉयलर नावाचे यंत्र तुमच्या शेतात १० मीटरच्या अंतरावर विरुद्ध दिशेने चालवा, ज्यामुळे जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढेल आणि दुष्काळाची अनपेक्षित परिस्थिती उद्भवल्यास पिकाचे दीर्घ कालावधीसाठी संरक्षण होण्यास मदत होईल.

गेल्या काही वर्षांपासून दुष्काळ, अतिवृष्टी किंवा असमान पाऊस अशा घटना पीक शेतात उभे असताना घडून येताना दिसत आहेत. अशा प्रतिकूल परिस्थितीत पीक वाचवण्यासाठी, सोयाबीन पेरणीसाठी बीबीएफ (ब्रॉड बेड फरो सिस्टीम) किंवा (रिज-फरो सिस्टीम) पद्धतीने सोयाबीन पेरावे. त्यासाठी आवश्यक संबंधित उपकरणे किंवा उपकरणांची व्यवस्था करावी.

शिफारस केलेल्या वेगवेगळ्या परिपक्वता कालावधी असलेल्या सोयाबीनच्या २ किंवा ३ जाती पेरणीसाठी निवडाव्यात आणि बियाण्याची उपलब्धता आणि गुणवत्ता सुनिश्चित करावी. (बियाणे उगवण किमान ७०% असावी)



सोयाबीन लागवडीसाठी आवश्यक निविष्ठांची (बियाणे, खत-खते, बुरशीनाशके, कीटकनाशके, तणनाशके, सेंद्रिय संवर्धन इ.) खरेदी आणि उपलब्धता सुनिश्चित करावी.

जर एखाद्या शेतकरी बांधवास त्याच्या घरातील किंवा शेजारच्या शेतकऱ्याकडून मागील वर्षीचे बियाणे पेरणीसाठी वापरायचे असेल तर त्याने त्या बियाण्याची उगवण क्षमता ७० टक्के किंवा त्याहून अधिक असल्याची खात्री करावी व मगच ते बियाणे पेरणीसाठी वापरावे.

वेगवेगळ्या परिपक्वता कालावधीसह तुमच्या प्रदेशासाठी शिफारस केलेल्या २-३ जातीची लागवड करावी.

सोयाबीन पेरणी शिफारस केल्याप्रमाणे दोन ओळीमध्ये ४५ सें.मी. अंतर व दोन रोपांमधील अंतर ५-७ सें.मी राहील याप्रमाणे करावी. त्याचप्रमाणे, बियाणे २-३ सेमी एवढ्या खोलीवर पेरावे ठेवावे. सोयाबीन बियाणे दर ६५-७० किलो/हेक्टर पेरणीसाठी वापरावा.

**– एस. ए. जायभाय**

(सोयाबीन कृषीविद्यावेत्ता व वैज्ञानिक-ड)भा.क.सं.प. अखिल भारतीय समन्वीत सोयाबीन संशोधन प्रकल्प आघारकर संशोधन संस्था, पुणे.-

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# उच्च रक्तदाबावर नियंत्रण महत्त्वाचे: जागतिक रक्तदाब दिनानिमित्त उपक्रमात आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती,**

जागतिक उच्च रक्तदाब दिन १७ मे रोजी साजरा करण्यात आला. यानिमित्ताने दि. १६ जूनपर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. जागतिक उच्च रक्तदाब दिनानिमित्त 'रक्तदाब अचूक मोजा, नियंत्रण ठेवा आणि दीर्घायुषी राहा' असे आवाहन करण्यात आले आहे.

योग्य वेळी उपचार न मिळाल्यास हृदयविकार, स्ट्रोक आणि मूत्रपिंड निकामी होण्यासारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. जगभरात १.२८ अब्जाहून अधिक प्रौढांना उच्च रक्तदाब आहे, जो जागतिक स्तरावर एक प्रमुख आरोग्य धोका बनला आहे. विशेषतः भारतात, प्रत्येक तिसरा व्यक्ती या गंभीर आजाराने ग्रस्त आहे आणि यातील जवळपास निम्म्या लोकांना याची जाणीवही नाही.जास्त मीठ, तळलेले



पदार्थ, साखर, शारीरिक हालचालींचा अभाव, धूम्रपान, मद्यपान आणि अनुवांशिक इतिहास हे उच्च रक्तदाबाचे प्रमुख जोखीम घटक आहेत. अनेकदा कोणतेही लक्षण न दिसल्याने हा आजार ओळखणे कठीण होते.

प्रतिबंध आणि व्यवस्थापनासाठी च आरोग्यदायी आहार, मर्यादित व्यसने, नियमित व्यायाम, योगासने, ध्यान, आणि रक्तदाबाची नियमित तपासणी आवश्यक आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधे घेणेही महत्त्वाचे आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्रत्येक शासकीय रुग्णालयात उच्च रक्तदाबाची तपासणी आणि औषधोपचार निःशुल्क केले जातात. ३० वर्षांवरील प्रत्येकाने आपला रक्तदाब नियमित तपासण्याचे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक यांनी केले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

गुरुवार दि. ५ जून २०२५

शहर/ग्रामिण


## पावसाळा, प्रतिकूल हवामानामुळे पुरवठा विभागाचा निर्णय

# ७८,१३१ रेशनकार्ड धारकांना आगाऊ 3 महिन्यांचे धान्य

### जूनमध्येच ऑगस्ट पर्यंतच्या धान्याचे वाटप



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती** पुरवठा विभागाच्या वतीने तीन महिन्याचे आगाऊ धान्य जून मध्येच रेशन कार्डधारकाना वितरीत होणार आहे. शहरात ७८ हजार १३१ रेशनकार्डधारक एकाचवेळी तीन महिन्याचे धान्य वितरित केले जात आहे. याकरिता ६८ स्वस्त धान्य दुकानदारांना धान्याचा पुवरठा देखील करण्यात आला आहे. आगामी पावसाळा आणि परिणामी पूर इत्यादी प्रतिकूल हवामान परिस्तिथीमुळे कार्यक्षमलॉजिकस्टिक आणि साठवणुकीसाठी राज्यांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता, लाभार्थ्यांना वेळेतअन्नधान्याचे वितरण करण्यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत पात्र शिधापत्रिकाधारकांना माहे जून, मध्येच आगाऊ तीन महिन्याचे एकत्रित धान्य रास्तभाव दुकानातून वितरण होणार आहे, करिता अमरावती शहरातील अन्नधान्याकरिता पात्र रेशन कार्ड धारकांनी संबधित रास्तभाव दुकानात प्रत्यक्ष जाऊन धान्याची उचल करावी. माहे जून, जुलै, ऑगस्ट या एकत्रित तीन महिन्याचे धान्य शासकीयगोदामातून रास्तभाव दुकानात पोहोचविण्याचे काम जलद गतीने सुरु आहे. सद्यस्थितीत एकूण ६८ रास्तभाव दुकानात तीन महिन्याचे पूर्ण धान्य पोहोचलेले आहे. त्यामुळे एकाचवेळी तीन महिन्याचा थम पॉस मशीनवर द्यावा लागणार आहे. अत्योंदय धारकांना प्रत्येकी १०५ किलो तर प्राधान्य गटातील कार्ड धारकांना प्रतिव्यक्ती १५ किलो धान्य मिळणार आहे.

(कलर बॉक्स)

**शहरातील ६८ स्वस्त धान्य दुकानदारांना धान्याचे वितरण**

**अन्यथा मिळणार नाही धान्य**

रेशन कार्ड मधील ज्या सदस्यांची केवायसी बाकी आहे. त्यांनी कुठल्याही परीस्थित या महिन्यात पूर्ण करायची आहे. अन्यथा त्याशिवाय धान्य मिळणार नसल्याचे पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले. अमरावती शहरातील अन्नधान्याकरिता पात्र रेशन कार्ड धारकांनी संबधित रास्तभाव दुकानातून माहे जून मध्येच तीन महिन्याचे धान्याची उचल करावी. तसेच रेशन कार्डमधील ज्यांची केवायसी शिल्लक आहे. त्यांनी याच महिन्यात प्राधान्याने पूर्ण करावी. अपात्र शिधापत्रिका शोधमोहीम अंतर्गत शिधापत्रिका तपासणी नमुना रास्तभाव दुकानदाराकडे भरून द्यावा.

**प्रवीण राऊत,** अन्न धान्य वितरण अधिकारी, अमरावती.

# अमरावती जिल्ह्याला भूकंपाचा सौम्य धक्का ३.८ रिश्टर स्केलची नोंद

## मेळघाट भूकंपाचा केंद्रबिंदु

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील धारणी तालुक्यासह अकोला आणि बुलढाणा जिल्ह्यांच्या उत्तर भागात बुधवारी रात्री ९:५७ वाजता भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर यांची नोंद ३.८ इतकी करण्यात आली आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू च्या शिवझिरी अमरावती जिल्ह्यातील धारणी नजीकच्या आणि मध्य प्रदेशातील मेळघाट पर्वतरांगेत जमिनीपासून १० किलोमीटर खाली होता, असे एनसीएसच्या रिपोर्टमध्ये म्हटले आहे. अमरावती जिल्हा प्रशासनाने देखिल या घटनेला दुजोरा दिला असून कुठल्याही प्रकारची हानी झाली नसल्याचे म्हटले आहे.

धारणी तालुक्यातील काही गावांमध्ये बुधवारी रात्री ९.५७ वाजता ३.८ रिक्टर स्केलचा सौम्य स्वरुपाचा भूकंप झाल्याची नोंद राष्ट्रीय भूकंपविज्ञान केंद्रांत झालेली आहे. प्रत्यक्षात या




गावांमधील नागरिकांना कुठल्याही स्वरुपाचे धक्के जाणवले नसल्याची माहिती धारणीचे तहसीलदार प्रदीप शेवाळे यांनी दिलीधारणी तालुक्यातील शिवझिरी हे भूकंपाचे केंद्र असल्याचे 'एनसीएस'च्या रिपोर्टमध्ये नमूद आहे व या लगतच्या सुसर्दा, राणीगाव, डाबला, नारदु या गावांच्या परिसरात सौम्य स्वरुपाचा भूकंप झाल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी दिली. त्यांनी याबाबत धारणी तहसीलदारांना याबाबत माहिती दिली व या गावांमध्ये तलाठी, मंडळ अधिकारी यांची चमू पाठविण्यात आली. शिवाय तहसीलदार शेवाळे यांनी या गावांमधील काही नागरिकांशी संपर्क केला असता, कुठल्याही स्वरुपाचा धक्का जाणवला नसल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यात अप्पर वर्धा धरणावरील भूकंपमापक यंत्र कित्येक वर्षांपासून बंद आहे. या यंत्राची दुरुस्ती अद्याप करण्यात आलेली नसल्याचे वास्तव आहे.

**गतवर्षी ४.२ रिश्टर स्केलचा भूकंप**

गतवर्षी ३० सप्टेंबर २०२४ रोजी, अमरावतीजिल्ह्यात ४.२ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला होता. या भूकंपाचा केंद्रबिंदू चिखलदरा तालुक्यातील अमझरी आणि टेट्रू गावांच्या दरम्यान होता. या भूकंपामुळे त्यावेळी कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झालेले नसल्याची माहिती प्रशासनाने दिली.

## वाहनांना 'एचएसआरपी' नंबर प्लेट नाही, तर आरटीओत काम होणार नाही, नागरिकांची कोंडी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ अमरावती-** केंद्र सरकारने २०१९ पूर्वीच्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसवण्याची सक्ती केली आहे. परंतु, लोकांनी ती गंभीरतेने घेतलेली दिसत नाही. आता मात्र परिवहन खात्याने १६ जूनपासून ही पाटी नसलेल्या वाहनांची 'आरटीओ'तील कामे थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची कामे खोळंबणार आहेत.

केंद्र सरकारच्या निर्णयानंतर राज्यात १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या सर्व वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बंधनकारक करण्यात आली आहे. परंतु, १० टक्केही वाहनधारकांनी ही पाटी बसवलेली नाही. त्यामुळे परिवहन आयुक्त




कार्यालयाने सर्व आरटीओ कार्यालयांना २ जूनला एक आदेश दिला आहे. या आदेशानुसार, १६ जून २०२५ पासून ही पाटी नसलेल्या वाहनधारकांच्या वाहनांच्या नोंदणी प्रमाणपत्रामध्ये (आरसी) पत्ता बदल करणे, वाहनावरील वित्त बोजा चढवणे वा उतरवणे, दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र देणे, ना- हरकत प्रमाणपत्र जारी करणे, वाहनांमध्ये बदल करणे इत्यादी कामे थांबवली जाणार आहेत. परंतु, राज्यात ही पाटी बसवण्यासाठी ३० जून २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

परिवहन आयुक्तांच्या आदेशानुसार, 'एचएसआरपी' नसलेल्या वाहनांची काही कामे थांबवली जाणार असली तरी जुन्या वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण, परवानाविषयक काम व खासगी वाहनांचे नोंदणी प्रमाणपत्र नूतनीकरण केले जाणार आहे.

## अमरावतीत कृषी विभागाच्या विविध योजनांसाठी

# ५५,९२५ शेतकऱ्यांची निवड

### पात्र शेतकऱ्यांना १० दिवसात कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती-** कृषी विभागाच्या विविध योजनांसाठी 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर अमरावती जिल्ह्यातील ५५,९२५ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली आहे. या निवड झालेल्या शेतकरी आणि घटकांची सुमारे २० कोटी रुपयांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. अमरावती जिल्ह्यातील निवड झालेल्या ५५,९२५ शेतकऱ्यांना कृषी आयुक्तालय पुणे यांच्यामार्फत लवकरच लघुसंदेश पाठवले जात आहेत. ही यादी महाडीबीटी पोर्टल, कृषी विभागाचे संकेतस्थळ तसेच कृषी विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या लॉगिनवरही उपलब्ध आहे. ज्या शेतकऱ्यांची निवड झाली आहे, अशा शेतकऱ्यांनी येत्या १० दिवसांमध्ये आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करायची आहे. त्यानंतर पात्र लाभार्थ्यांना तात्काळ पूर्वसंमती मिळेल. पात्र लाभार्थ्यांकडून १० दिवसांत कागदपत्रांची पूर्तता न झाल्यास, त्यांचा अर्ज आपोआप रद्द होईल. प्रोफाईल १०० टक्के पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांनी

ॲग्रिस्टीक फार्मर आयडीच्या आधारे हींींि://ाहरवलीं. ाहरीरिहींर.सीं.ळप या साईटवर लॉगिन करावे. ज्यांचे प्रोफाइल




५० टक्के पूर्ण आहे, त्यांनी ते १०० टक्के पूर्ण करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत. अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील लाभाथ्यर्थ्यांनी जातीचा दाखला अपलोड करणे बंधनकारक आहे. अपंग असल्यास (सर्व जातींसाठी) अपंगाचा दाखला अपलोड केल्यास लाभार्थीचे प्रोफाइल १०० टक्के पूर्ण होते. ज्यांच्याकडे ॲग्रिस्टीक फार्मर आयडी नसेल, त्यांनी तो नजीकच्या (सी. एस. सी.) केंद्राकडून काढून घ्यावा. या योजनेत मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, कृषी यांत्रिकीकरण उप-अभियान आणि भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना यांचा समावेश आहे. एकूण ५५,९२५ शेतकऱ्यांसाठी सुमारे २० कोटी रुपयांचे अनुदान निश्चित करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी दिली आहे.-

# कृषि निविष्ठांमध्ये लिंकींग झाल्यास सक्त कारवाई करावी-जिल्हाधिकारी येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ अमरावती,**

येत्या खरीप हंगामात शेतकऱ्यांची लिंकींगमध्ये पिळवणूक होऊ नये, यासाठी राज्यस्तरावरून निर्देश देण्यात आले आहे. त्यामुळे स्थानिक विक्रेत्यांच्या स्तरावर कृषि निविष्ठांमध्ये लिंकींगचे प्रकार झाल्यास कृषि विभागाने सक्त कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयात आज कृषि विभागाचा आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी राहुल सातपुते, आत्माच्या प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने, जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री.



येरेकर म्हणाले, खरीप हंगामात सुरवातीला बियाणे कमी पडणार नाही, याची दक्षता घ्यावी. शेतकरी विशिष्ट वाणाचा आग्रह करीत असल्यामुळे या बियाणांचा तुटवडा पडण्याची शक्यता असते. त्यामुळे कंपनीस्तरावर प्रयत्न करून बियाणांची उपलब्धता होईल, यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. जिल्ह्यात सोयाबीन आणि कापूस पिकांची लागवड मोठ्या प्रमाणात होणार आहे. कापूस पिकांसाठी पर्यायी असलेल्या वाणांची पेरणी करण्यासंदर्भात शेतकऱ्यांना माहिती द्यावी. बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या बियाणांची उगवण क्षमता तपासूनच विक्रीसाठी ठेवण्यात यावे. कोणत्याही परिस्थिती बोगस आणि प्रतिबंधित बियाणांची विक्री होणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्यासोबतच येत्या काळात खतांच्या उपलब्धतेबाबत प्रयत्नशील राहावे. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी गोपीनाथ मुंडे सानुग्रह योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, पिक विमा, आपत्कालीन मदत आदी योजना राबविण्यात येत आहे. या सर्वांचा लाभ मिळविण्यासाठी आता ग्रीस्टॅक अंतर्गत शेतकऱ्यांना नोंदणी क्रमांक मिळविणे आवश्यक आहे. यात ग्रामस्तरावर शिबीर घेऊन नोंदणीची गती वाढवावी. यात येणाऱ्या अडचणी जाणून त्यावर उपाययोजना करण्यात येईल. पहिल्या टप्प्यात नोंदणी करण्यावर लक्ष देण्यात यावे. आत्मा, स्मार्ट आणि कृषि संजीवनी प्रकल्पांद्वारे शेतकऱ्यांना विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. याबाबतही शेतकऱ्यांना माहिती देण्यात यावी.शेतकऱ्यांना पतपुरवठा हा महत्वाचा घटक आहे. ७८ टक्के रक्कमेचे कर्जवाटप झालेले असले तरी सहभागी शेतकऱ्यांची संख्या कमी असल्याने अल्प, अत्यल्प शेतकऱ्यांना कर्जाचे वाटप करण्यात यावे.

शेतकऱ्यांनी ३१ मार्चपूर्वी कर्जाची रक्कम भरणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांना कर्ज मिळत नसल्याने शेतकऱ्यांकडून कर्ज भरून त्यांना नव्याने कर्ज देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

कर्ज देताना सीबिल स्कोअर तपासण्यात येऊ नये, या प्रकारची तक्रार आल्यास कठोर कारवाई करावी. यासोबतच कृषि विभागाने अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जन्मवर्षानिमित्त सुशासन, महिला सक्षमीकरण आणि जलसंधारणाची कामांमध्ये योगदान द्यावे, असे आवाहन केले.-

# परीक्षेच्या दिवशी शिक्षकांना प्रशिक्षणाची सक्ती नको

## शिक्षकांना दिलासा देण्याची चंद्रशेखर भोयर यांची मागणी

**शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना निवेदन सादर**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती -** वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड श्रेणी प्रशिक्षणासाठी नोंदणी केलेल्या परंतु यशवंतराव बव्हाण मुक्त विद्यापीठ अथवा इतर विद्यापीठामार्फत घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षांना प्रविष्ट शिक्षकांना परीक्षेच्या दिवशी प्रशिक्षणाची सक्ती न करता त्यांना गैरहजर राहण्याची सवलत द्यावी अशी मागणी शिक्षक महासंघाचे अध्यक्ष व भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक चंद्रशेखर भोयर यांनी करीत त्या संदर्भातील निवेदन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना सादर केले. यावेळी आमदार सुधाकर कोहळे उपस्थित होते.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांचे मार्फत वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणीचे प्रशिक्षण २ जून ते १२ जून २०२५ या कालावधीत घेण्यात येत आहे. सदर प्रशिक्षणाची नोंदणी होण्यापूर्वी महाराष्ट्रातील हजारो शिक्षकांनी विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेला आहे. तसेच महाराष्ट्रातील अनेक शिक्षक यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठा तर्फे घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षांना प्रविष्ट झालेले आहेत. या परीक्षांच्या तयारीसाठी शिक्षकांनी वर्षभर अभ्यास केलेला आहे. या परीक्षांच्या तारखा ही यापूर्वीच जाहीर झालेल्या होत्या, परंतु ऐनवेळी बरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणी प्रशिक्षणाच्या तारखा जाहीर झाल्याने एकाच वेळी दोन ठिकाणी उपस्थित राहणे शिक्षकांना शक्य नाही. अशावेळी परीक्षादेणाऱ्या शिक्षकांना परीक्षेच्या दिवशी प्रशिक्षणास हजर राहणे शक्य नाही. ही महत्वपूर्ण बाब लक्षात घेता इतर विद्यापीठाच्या अथवा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या विविध परीक्षांना प्रविष्ट होणाऱ्या शिक्षकांना परी-क्षेच्या दिवशी निवडश्रेणी व वरिष्ठ बेतनश्रेणी



प्रशिक्षणास गैरहजर राहण्याबाचत सवलत देण्यात यावी किंवा सदर दिवसाच्या प्रशिक्षणाची वेळ बदलावी, अशी मागणी चंद्रशेखर भोयर यांनी केली आहे. या महत्त्वपूर्ण अडचणीतून मार्ग काढून शिक्षकांना दिलासा मिळावा यासाठी भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक चंद्रशेखर भोयर यांनी मुंबईमध्ये शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले.

# मेळघाटातील गर्भवती महिलांची आरोग्य सेवा धोक्यात

## 'एनएचएम' इन्सेटिव्हसाठी अनावश्यक रेफरलचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मेळघाट-** जिल्हा सामान्य रुग्णालयात नवीन इमारत सुरू झाल्यापासून मेळघाटातून रुग्ण रेफरचे प्रमाण वाढीस लागले आहे, तर दुसरीकडे सहजतेने गर्भवती महिलेची प्रसूती होऊ शकते तरीही डफरीनमध्ये पाठविले जाते. कारण सिझेरियनसाठी डॉक्टरांना 'एनएचएम'मधून इन्सेटिव्ह मिळत असल्यामुळे हा प्रकार वाढीस लागल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली आहे.मेळघाटातील धारणी व चिखलदरा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालय असा आरोग्य यंत्रणेचा भला मोठा डोलारा आहे. गर्भवती महिलेची प्रसूती सहजतेने होऊ शकते तरीही थेट अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात रुग्ण रेफरचे प्रमाण मोठ्या संख्येने वाढले आहे.

**डफरीनमध्ये प्रसूतीसाठी रेफर रुग्ण**

| वर्ष | आलेले रुग्ण | प्रसूती |
|---|---|---|
| २०२१-२०२२ | ९०९ | ३४० |
| २०२२-२०२३ | ५४४ | १६२ |
| २०२३-२०२४ | ५८६ | १७३ |
| २०२४-२०२५ | ४३८ | १४९ |




**गरीब, सामान्य गर्भवती महिलेची हेळसांड का?**

मेळघाटात प्रत्येक उपकेंद्राला समुदाय आरोग्य अधिकारी देण्यात आले, पण ते मुख्यालय राहतच नाही. त्यामुळे रुग्ण रेफरचे प्रमाण वाढले आहे. मेळघाटात समुदाय आरोग्य अधिकारी, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य केंद्र तसेच अचलपूर येथे स्त्री रुग्णालय असताना गरीब रुग्णांचे हाल होत आहेत. मात्र डॉक्टरांकडून हा प्रकार सुरू आहे.

याविषयी चौकशी केल्यास बरेच तथ्य बाहेर आल्याशिवाय राहणार नाही, अशी माहिती आहे. महिलेची प्रसूती अमरावतीत, तर मेळघाटातील डॉक्टरांचे 'इन्सेटिव्ह' राष्ट्रीय आरोग्य मिशनमधून काढण्याचा प्रकार सुरू आहे. मेळघाटातून रुग्ण अमरावतीत रेफरचे ऑडिट केल्यास यातील वास्तव समोर येईल, अशी माहिती आहे. गेल्या काही दिवसांपासून हा प्रकार सातत्याने सुरू असल्याचे चित्र आहे.

पूर्वीपेक्षा अलीकडे मेळघाटातून गर्भवती महिलांना अमरावतीत रेफर करण्याचे प्रमाण कमी झाले आहे. साधारणतः प्राथमिक आरोग्य केंद्रातून रुग्ण अधिक येतात. वरूड, मोर्शी येथूनही प्रसूतीसाठी रुग्ण पाठविले जातात. दरमहा सरासरी किती रुग्ण रेफर केले जातात, ही आकडेवारी तूर्तास सांगता येणार नाही.

**- डॉ. विनोद पवार,** अधीक्षक जिल्हा स्त्री रुग्णालय,अमरावती

# हाजी युसूफ खान यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ११ तारखेला रक्तदान

## सायन्सस्कोर मैदानातील उत्सव मेला मध्ये होणार आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–** उत्सव मेळ्याच्या माध्यमातून सुमारे २०० लोकांना रोजगार आणि शहरवासीयांना मनोरंजन देणारे हाजी युसूफ खान यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ११ तारखेला रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दिवंगत हाजी युसूफ खान हे त्यांच्या सामाजिक सेवेसाठी देखील ओळखले जातात. एखाद्या परित्यक्त व्यक्तीचे अंतिम संस्कार असोत किंवा आरोग्य सेवेत एखाद्याला मदत करणे असो, ते नेहमीच तत्पर राहिले आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या मुलांनीही त्यांचे काम सुरू ठेवले आहे. अलिकडेच नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.व या शिबिरात सुद्धा अनेक शेकडो गरजू नागरिकांनी आपल्या डोळ्यांची तपासणी केली.

आता, या कडक उन्हात रक्ताची कमतरता लक्षात घेता, त्यांचे पुत्र रहीम खान यांनी सांगितले आहे की, स्वर्गीय हाजी युसूफ खान यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाईल. हे लक्षात घेण्यासारखे आहे की




दरवर्षी सायन्सस्कोर मैदानावर सुमारे दोन महिने हा उत्सव मेला आयोजित केला जातो. ज्यामध्ये केवळ शहरातीलच नाही तर जिल्ह्यातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होतात.



### रक्तदात्यांना मोफत प्रवेश मिळेल

या कार्यक्रमात रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांना त्यांच्या कुटुंबासह महोत्सव मेळ्यात मोफत प्रवेश मिळण्याची संधी मिळेल आणि त्यांच्या कुटुंबासह आत असलेल्या ४ झुल्यांचा आनंद घेण्याची संधी देखील मिळणार आहे.

या रक्तदान शिबिरात १०० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करण्याची अपेक्षा आहे. दिवंगत हाजी युसूफ खान यांचे पुत्र रहीम खान, अजीज खान, हाफिज खान, रायफाज खान, आमिर खान, अहमद खान आणि मित्र आणि कुटुंब या कार्यक्रमासाठी प्रयत्न करत आहेत.सकाळी १० वाजल्यापासून या रक्तदान शिबिराला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सुरुवात होणार आहे.

## अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत एससी, एसटी आणि ओबीसी कोटा लागू करण्याचा निर्णय

### संस्थाचालक अन् विद्यार्थ्यांची डोकेदुखी वाढली?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ अमरावती**

अकरावी प्रवेशाच्या संदर्भात रोज नवनवीन गोष्टी समोर येतायत. कधी ऑनलाइन प्रवेशाची तारीख बदलते तर कधी प्रवेश प्रक्रियेत बदल होताना दिसतो. अशातच आता अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत आता एससी, एसटी, ओबीसी कोटा लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. अल्पसंख्यांक कोट्याला कुठलाही धक्का लावण्यात येणार नाही सुधारित परिपत्रकात शासनाकडून स्पष्ट करण्यात आलंय. नेमका हा निर्णय काय आहे आणि यामुळे विद्यार्थ्यांवर आणि संस्थाचालकांवर याचा काय परिणाम होऊ शकतो.

राज्याच्या शालेय शिक्षण मंत्रालयाने अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत एससी, एसटी आणि ओबीसी कोटा लागू करण्याचा निर्णय घेतलाय. या निर्णयामुळे अल्पसंख्याक संस्थांच्या ५० टक्के कोट्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात होती. त्यानुसार, काही संस्थांनी सरकारच्या या निर्णयाविरोधात



कोर्टात आव्हान देण्याचा निर्णयही घेतला होता. पण या प्रकरणी वाद उत्पन्न होताच मंत्रालयाने सुधारित परिपत्रक जारी करून अल्पसंख्याक कोट्याला कोणताही धक्का लावण्यात येणार नसल्याचे स्पष्ट केले.


शासनाने जारी केलेल्या सुधारित आदेशात स्पष्ट उल्लेख केला आहे की या निर्णयामुळे अल्पसंख्याक आरक्षणाला कुठला ही धक्का लागू दिला जाणार नाही. सरकारने आपल्या सुधारित परिपत्रकात म्हटले आहे की, अल्पसंख्याक उच्च माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अल्पसंख्यांक कोट्यांतर्गत विद्यार्थ्यांना ५० टक्के जागा राखीव असतात. या कोट्यातील जागा शाळा व्यवस्थापनास ३ फेर्यापर्यंत गुणवत्तेनुसार भरण्याची मुभा असते. नियमित ३ फेर्या संपेपर्यंत महाविद्यालयांना अल्पसंख्यांक कोट्यातील जागा सर्वसाधारण जागांमध्ये प्रत्यार्पित करता येत नाही. ३ फेर्यानंतर या कोट्यातील रिक्त राहणार्या जागा चौथी नियमित फेरी सुरू होण्यापूर्वी सर्वसाधारण जागांमध्ये प्रत्यार्पित करता येतात.

## सोलापूर-पुणे महामार्गावर ट्रॅव्हल्स बसचा अपघात

### पुणे अन् मराठवाड्यातील ३० प्रवासी गंभीर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५सोलापूर–** पुणे महामार्गावर आढेगाव शिवारात खाजगी गाडीच्या बसचालकाला झोप लागल्याने बस खड्यात पलटी होऊन अपघाताची घटना घडली. गुरुवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास हा मोठा अपघात झाला. या अपघातात पुणे व मराठवाड्यातील ३० प्रवाशी जखमी झाले असून २० गंभीर जखमी असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, शिरपूर लातूर येथून



खासगी बस एमएच ४८ के १९१८ ही बुधवारी रात्री उशिरा पुण्याकडे निघाली होती. सोलापूर पुणे महामार्गावरील आढेगाव शिवारात धावती बस अचानक पलटी झाल्याने मोठा आवाज झाला. याचवेळी या मार्गावरून धावणाऱ्या गाड्या चालकांनी व परिसरातील लोकांनी जखमींना तात्काळ रुग्णालयात पोहोचण्यासाठी मोठी धावपळ केली. या घटनेची माहिती पोलिसांना दिल्यानंतर पोलीस ही तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## लाडकी बहिणच्या यशानंतर

## भाजपने पुढील निवडणुका जिंकण्यासाठी आखली नवीन रणनीती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ नागपूर–** भारतीय जनता पक्षाने स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. यासाठी भाजपचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात सोमवारी पूर्व आणि पश्चिम विदर्भातील पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारच्या ११ वर्षातील यशस्वी योजना सामान्य जनतेपर्यंत पोहचवण्याचा संकल्प व्यक्त केला. सोबतच यासाठी भाजप पहिल्यांदाच स्वयंसेवी संस्थांची मदत घेऊन सरकारी योजनांचा जनतेमध्ये प्रचार करणार असल्याचे सांगितले. परंतु, चव्हाण यांच्या या वक्तव्यामुळे भाजपसारख्या सर्वात मोठ्या पक्षाला स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी लागत असल्याचे समोर आले असून त्यावर आश्चर्य व्यक्त केले जात आहे. सोमवारी मुंडले शाळेच्या सभागृहात झालेल्या कार्यशाळेला चव्हाण यांनी संबोधित केले. यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी भाजपच्या संघटनात्मक



बांधणीबाबत माहिती दिली. ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ११ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला आहे. त्यानिमित्त भाजपच्यावतीने देशभर संघटन पर्व राबवले जाणार आहे. 'संकल्प ते सिद्धी' या माध्यमातून मोदी यांच्या नेतृत्वात झालेला विकास, देशाची सुधारलेली आर्थिक परिस्थिती, जगात चौथ्या क्रमांची अर्थव्यवस्था, पाकिस्तानला दिलेले सडेतोड उत्तर याची माहिती घरोघरी जाऊन नागरिकांना दिली जाणार आहे. यासाठी पहिल्यांदाच भाजप स्वयंसेवी संस्थांची मदत घेणार आहे. बैठकीला १९ जिल्ह्यांचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यशाळेला भाजपचे शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी, आमदार प्रवीण दटके आणि अन्य पदाधिकारीही उपस्थित होते.२५ जूनला काळा दिवस पाळणार देशात आणीबाणी कोणी लावली, संविधानाची पायमल्ली कोणी केली, त्याचे देशावर काय दुष्परिणाम झाले याची माहिती भाजपच्यावतीने घरोघरी जाऊन दिली जाणार आहे. याच कार्यक्रमात २५ जून रोजी काळा दिवस पाळला जाणार आहे. याचदिवशी देशात आणीबाणी लावण्यात आली होती. शेकडो समाजसेवकांना कारागृहात टाकण्यात आले होते, याबाबत माहिती दिला जाणार आहे. या माध्यमातून संविधानाचा अपमान करणारी काँग्रेसच आहे, असा संदेश घरोघरी पोहचवला जाणार असल्याची माहिती चव्हाण यांनी दिली. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा या आंदोलनाची रूपरेषा जाहीर करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## पूररेषेच्या आतील अतिक्रमणे रोखा, सर्व्हेक्षणात अचूकतेसाठी उपग्रहाद्वारे मॅपिंग करा- मुख्यमंत्री

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मुंबई –** पूररेषेच्या आत अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी. यासाठीचे सर्व्हेक्षण करताना अचूकतेसाठी उपग्रहाद्वारे मॅपिंग करावे. आपत्ती व्यवस्थापनामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी एका बैठकीत दिले.

सह्याद्री अतिथीगृहात राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन, मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव-



पाटील, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री आशिष जयस्वाल आदी उपस्थित होते. कोकण भूमिगत वीज वाहिन्या, धूप प्रतिबंधक बंधारे, बांध घालणे, दरडप्रवण क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाययोजना यावर भर द्यावा असे मुख्यमंत्री म्हणाले.

### आपत्ती व्यवस्थापनाचे काम दर्जेदार करण्याचे निर्देश

आपत्ती व्यवस्थापनात दर्जेदार काम करावे, पावसानंतर नुकसान झालेले रस्ते, बंधारे, वीज वाहिन्या दुरुस्ती कामासाठीसुद्धा या निधीचा उपयोग करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. आपत्तींचा सर्वंकष अभ्यास करून त्यानुसार त्या त्या भागातील ग्रामपंचायतींना आपत्ती व्यवस्थापनाचे किट द्यावे, नदी स्वच्छ करून नदीतील गाळ काढणे, या कामांना जलसंपदा विभागाने प्राधान्य द्यावे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

ग्रामपंचायतींना आपत्ती व्यवस्थापन किट देत असताना आवश्यक मनुष्यबळाचे प्रशिक्षणही देण्यात यावे. किटमधील साहित्याचा अपघाताच्या वेळी मदत कार्यात उपयोग होऊ शकतो. त्यामुळे ग्रामपंचायतींना किट देण्याबाबत कार्यवाही व्हावी, असे मंत्री महाजन यावेळी म्हणाले.

## पाकिस्तानातून परतलेल्या सुनिताच्या मोबाइलमध्ये आढळले दोन संशयित पाकिस्तानी ॲप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५नागपूर –** एलओसी ओलांडून पाकिस्तानात जाणाऱ्या सुनिता या महिलेच्या मोबाइलच्या तपासणीतून धक्कादायक बाब समोर आली आहे. तिच्या मोबाइलमधून दोन संशयास्पद पाकिस्तानी ॲप्स आढळल्या आहेत. सुनिता काही दिवस पाकिस्तानी रेंजर्सच्या ताब्यात होती. त्यामुळे त्या प्स पाकिस्तानी एजन्सीजने इन्स्टॉल केले का, याची सखोल फॉरेन्सिक तपासणी सुरू आहे.

सुनिता १४ मे रोजी नियंत्रण रेषा ओलांडून पाकिस्तानी हद्दीत घुसली. ती गिलगिटमध्ये पाकिस्तानी नागरिक झुल्फिकारला भेटणार होती. याआधी तिला पाकिस्तानी रेंजर्सनी पकडले होते. चौकशीनंतर तिला बीएसएफच्या ताब्यात देण्यात आले. बीएसएफने तिला अमृतसर पोलिसांच्या स्वाधीन केले होते. पोलिस कोठडी संपल्यानंतर तिला कारागृहात पाठविण्यात आले होते. पोलिसांनी तिच्या मोबाइलची सायबर तज्ज्ञांकडून तपासणी केली. त्यात प्राथमिकदृष्ट्या तर कुठले मालवेअर आढळले नाही. मात्र, दोन पाकिस्तानी प्स



मात्र आढळले. सायबर तज्ज्ञांनी तिचे चॅट्स रिकव्हर केले आहेत. त्यात तिने काही पाकिस्तानी नागरिकांसोबत जेमस्टोनच्या व्यवसायाचा मुद्दा काढून बोलणे सुरू केल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र, त्यानंतर चॅटिंगची दिशा भलत्याच दिशेने गेल्याचे दिसून आले, अशी माहिती पोलिस उपायुक्त निकेतन कदम यांनी दिली. एनआयएच्या मुंबई पथकाने नागपूर पोलिसांशी संपर्क केला असून, काही प्रश्नांची यादी पाठविली आहे. या एकूण प्रकरणाची माहिती घेतल्यावर यात दहशतवादी ंगल आहे का, हे ठरवून त्यांचे विशेष पथक नागपुरात चौकशीसाठी येईल.सुनिता तिच्या मुलासोबत श्रीनगरवरून कारगिलला गेली होती. तिला एका स्थानिक व्यक्तीने लिफ्ट दिल्याची माहिती समोर आली. तिच्या मुलानेदेखील याला दुजोरा दिला आहे. संबंधित स्थानिक व्यक्तीला कारगिल पोलिसांकडून ताब्यात घेण्यात येणार आहे. दरम्यान, कारगिल पोलिसांचे पथक मंगळवारी नागपूरला पोहोचले. तेथील स्थानिक विशेष क्टनुसार कारगिल पोलिसांनी तिच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. कारगिल पोलिसांच्या पथकाने प्राथमिक चौकशी केली व त्यांना तिची कस्टडी हवी आहे.

# चिन्नास्वामी स्टेडियमबाहेरच्या चेंगराचेंगरीचं सगळं खापर एकट्या विराट कोहलीवर फुटलं

## BCCI अन् आयपीएलवाल्यांनी हात झटकले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ बेंगलुरु–** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये पंजाब किंग्जचा ६ धावांनी पराभव करून पहिल्यांदाच आयपीएलचे विजेतेपद जिंकले. जेतेपद जिंकल्यानंतर आरसीबी त्यांच्या होमग्राउंड एम चिन्नास्वामी स्टेडियमवर जल्लोष करण्यासाठी आला. पण येथे चेंगराचेंगरी झाली, ज्यामध्ये ११ जणांचा मृत्यू झाला आणि ४७ जण जखमी झाले. या दुर्घटनेनंतर एकच खळबळ उडाली असून, संपूर्ण देशात हळहळ व्यक्त केली जात आहे. मात्र या घटनेचं राजकारण आणि दोषारोप आता चिघळायला लागले आहेत.

बीसीसीआय आणि आयपीएल प्रशासनाने या संपूर्ण घटनेपासून स्वत:ला अलिप्त ठेवलं असून, हात झटकले आहेत. खरंतर, बंगळुरुतील पोलीस दल व इव्हेंट मॅनेजमेंट यंत्रणा अपयशी ठरल्याचं स्पष्ट असून आले. पण अनेक बड्या अधिकार्यांनी अप्रत्यक्षपणे विराटच्या चाहत्यांच्या जबाबदार धरलं आहे. दरम्यान, या घटनेवर आयपीएलचे अध्यक्ष अरुण धुमल यांची प्रतिक्रिया समोर आली आहे.

आयपीएलचे अध्यक्ष अरुण धुमल त्यांनी या घटनेवर तीव्र शोक व्यक्त केला आहे. ते म्हणाले, आम्हाला ही परिस्थिती कळताच आम्ही ताबडतोब आयोजकांशी बोललो. त्यांनी आम्हाला आश्वासन दिले की ते समारंभ लवकर संपवतील. ही घटना खूप




दुःखद आणि दुर्दैवी आहे. ते पुढे म्हणाले की, आरसीबी अधिकाऱ्यांनी त्यांना सांगितले की स्टेडियममध्ये उपस्थित असलेल्या लोकांना बाहेरील परिस्थितीची माहिती नव्हती

त्यांनी पुढे स्पष्ट केले की यासाठी बीसीसीआय जबाबदार नाही. धुमल यांनी इंडिया टुडेला सांगितले की, 'हे दुःखद आणि वेदनादायक आहे. ज्या कुटुंबांनी आपल्या प्रियजनांना गमावले त्यांच्या कुटुंबियांबद्दल आमच्या मनापासून संवेदना आहेत. बीसीसीआयसाठी आयपीएल काल रात्री संपली. आम्हाला अशा कोणत्याही घटनेची कोणतीही माहिती नव्हती, मग आम्हाला त्यासाठी कसे जबाबदार धरता येईल?'

# जागतिक पर्यावरण दिनी आपले शहर हिरवे शहर वृक्षारोपण अभियानचा शुभारंभ

## आदिवासी पर्यावरण सामाजिक संघटनेचा उपक्रम जुड़वा नगरीत जून ते सप्टेंबर पर्यन्त १५ टप्प्यात होणार वृक्षारोपण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अचलपूर**

दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा आदिवासी पर्यावरण सामाजिक विकास संघटनच्या आपले शहर-हिरवे शहर अभियानचा शुभारंभ पर्यावरण दिनी पुन्हा नगरवासी व हमीपत्रक धारक यांच्या सहयोगाने प्रमुख मान्यवर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले आहे... सदर सामाजिक पर्यावरण हिताय उपक्रम मध्ये सामिल होवून आपला परिसर हिरवा व प्रदूषण मुक्त करण्यासाठी विविध सामाजिक, राजकीय संघटना आज एकत्र येवून बालाजी मंदिर परिसर तिरुपती नगर येथे प्राणवायु स्त्रोत व दुर्मिळ वृक्ष यांचे रोपण करुण संगोपन, संवर्धनची जवाबदारी अभिजीत कालमेघ मित्र परिवार, गौरखेड़ा कुंबी ग्रामपंचायत यांनी घेतलेली आहे. आज विश्व पर्यावरण दिनी बालाजी मंदिर परिसर, तिरुपती नगर येथे दुर्मिळ होणारे वृक्ष म्हणजे पुत्रजीवा,उम्बर,अशोका व प्राणवायु स्त्रोत जाम्बुल, बेलपत्र चिंच, पिम्पल,वड या रोपटेचे




रोपण करण्यात आले, सदर सामाजिक उपक्रम मधे हमीपत्रक अभिजीत कालमेघ, राजा पिंजरकर, विजू मिश्रा,सुधीर देशमुख,सागर वाटाने, पुरोहित महाराज,अंकुश बिडकर ग्रामपंचायत सदस्य,सुरेंद्र आठवले, अम्बादास नाडुले तथा आदिवासी पर्यावरण सामाजिक संघटन व शकुंतला रेल बचाव प्रमुख योगेश खानझोड़े, गजानन कोल्हे, राजा धर्माधिकारी,सुरेश प्रजापती,प्यारेलाल प्रजापति, संजय डोंगरे,संतोष नरेडी, रामदास मसने, एस.बी.बारखडे,कमल केजरीवाल, राजकुमार बरडिया,वसंतराव धोबे, मुरलीधर पडोळे, संजय कोरे तर माहेर फाउंडेशनच्या शारदाताई उइके, दीपाताई तायड़े,कनिष्ठ अभियंता कपिल नंदगांवकर सहित राष्ट्वादी कोंग्रेसचे अमोल गोहाड,राहुल वैद्य यांच्या उपस्थितित वृक्षारोपण अभियान प्रारंभ करण्यात आला, सदर वेळी सर्वप्रथम विश्व पर्यावरण दिनी सर्व रोपटे यांचे पूजन माहेर फाउंडेशनच्या दीपा तायड़े व शारदा उइके यांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर विश्व पर्यावरण दिनाचे तथा झाड़ाचे महत्व बाबत मनोगत पूर्ण मार्गदर्शन योगेश खानझोड़े, अभिजीत कालमेघ, राजा धर्माधिकारी, गजानन कोल्हे, अंकुश भिड़कर यांनी व्यक्त केले तर आभार प्रदर्शन राजा पिंजरकर यांनी मांडले.

**सहभागी सामाजिक संस्था**

१:-अध्यक्ष तथा समस्त पदाधिकारी आदिवासी पर्यावरण सामाजिक विकास संघटन महा. प्रदेश२:-अभिजीत भाऊ काळमेघ मित्रमंडळ परतवाडा अचलपूर*३:-शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समिति अचलपुर४:-माहेर फाउंडेशन परतवाड़ा५:-मानव सेवा समिती परतवाड़ा६: तिरुपती रॉयल्स, तिरुपती नगर गौरखेडा७: ग्राम पंचायत गौरखेडा.

# सौर ऊर्जा प्रकल्पासाठी स्पर्धा : अमरावतीत एक गाव होणार 'मॉडेल सोलर व्हिलेज'

## १६ जूनपर्यंत प्रस्ताव सादर करण्याची मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

वीजेच्या बाबतीत स्वयंपूर्णता आणण्यासाठी जिल्ह्यातील एक गाव 'मॉडेल सोलर व्हिलेज' म्हणून तयार केले जाणार आहे. त्यासाठी जिल्ह्यातील ५ हजारहून अधिक लोकसंख्या असलेल्या गावांकडून प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. केंद्र शासनाच्या 'पी. एम. सूर्यघर मोफत वीज' योजनेंतर्गत महाऊर्जाकडून हे काम केले जाणार आहे.



सदर योजनेसाठीचे प्रस्ताव महाऊर्जाच्या विभागीय कार्यालयात स्वीकारले जातील. दरम्यान प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय निवड समिती पात्र गावांची अंतिमत: घोषणा करणार आहे. या घोषणेनंतर सर्व गावांना आपापसात स्पर्धा करावी लागेल. त्यासाठी कमाल ६ महिन्यांचा अवधी दिला जाणार आहे. स्पर्धा काळात जास्तीत जास्त अपारंपरिक ऊर्जा साधने किंवा सौर उपकरणे आस्थापित (इन्स्टॉल) करणे गरजेचे आहे.

सौर उपकरणांमध्ये पी.एम.सुर्यघर योजनेंतर्गत जास्तीत जास्त घरांवर सोलर रुफ टॉप प्रकल्प उभारणी करणे तसेच पी.एम. कुसुम योजनेंतर्गत जास्तीत जास्त सौर पंप अथवा इतर विकेंद्रीत अपारंपारिक ऊर्जा प्रकल्प आस्थापित करणे गरजेचे आहे. अशाप्रकारे गावात सर्व अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पांची क्षमता दहा मेगा वॅटपर्यंत असणे अपेक्षित आहे. याकरीता सी.एस.आर.निधी, विभाग किंवा जिल्हास्तरीय निधी व इतर उपलब्ध असलेल्या निधीचा वापर करण्याची मुभा देण्यात आली आहे. याशिवाय अग्रणी बँकेमार्फत वैयक्तिक लाभार्थ्याला सौर प्रकल्प उभारणीकरीता बँकेच्या पात्रता निकषानुसार कर्ज उपलब्ध होऊ शकेल.

पारंपरिक वीजेचे उत्पादन दिवसेंदिवस मर्यादित होत चालल्याने कोळसा आणि पाण्यापासून तयार होणाऱ्या वीज वापराला मर्यादा आल्या आहेत. परिणामी अपारंपरिक वीजेचा वापर वाढावा, यासाठी शासनाकडून प्रयत्न चालविले जात आहे. सदर स्पर्धा हा त्या प्रयत्नांचाच एक भाग आहे.

दरम्यान गावाची निवड करण्यासाठी गठित समितीमध्ये जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्यासह जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या (डीआरडीए) प्रकल्प अधिकारी प्रिती देशमुख व जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) बाळासाहेब बायस यांचा समावेश आहे. याशिवाय महाउर्जा चे विभागीय महाव्यवस्थापक प्रफुल्ल तायडे हे या समितीचे सदस्य सचिव आहेत.

# जिल्हापरिषदेच्या कार्यक्रमात फुलांच्या बुक्यांना पूर्णविराम

## आता बुकेऐवजी शालेय साहित्य व फळझाडांची रोपे देऊन मान्यवरांचे स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती :**

जिल्हापरिषद अमरावती अंतर्गत सर्व कार्यालयांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये मान्यवरांचे स्वागत करताना ताज्या फुलांच्या बुकेऐवजी शालेय साहित्य, ज्ञानवर्धक पुस्तके, फळझाडांची रोपे देण्याची किंवा स्वीकारण्याची नवीन पद्धत अंमलात आणण्याबाबत जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा यांनी परिपत्रक निर्गमित केले आहे. या अभिनव उपक्रमाचे विविध स्तरावर स्वागत केले जात आहे.




अमरावती जिल्हापरिषदेंतर्गत विविध कार्यालयांव्दारा अनेकवेळा बैठकांचे आयोजन होत असते. अशा वेळी राजशिष्टाचार म्हणून मान्यवरांचे स्वागत फुलांच्या बुकेऐवजी शालेय साहित्य, ज्ञानवर्धक पुस्तके, फळझाडांची रोपे देण्याची किंवा स्वीकारण्याची नवीन पद्धत सुरु करण्याची बाब विचाराधीन होती. त्यानुषंगाने जिल्हापरिषद अमरावती अंतर्गत विविध कार्यालये, पंचायत समिती, तालुका कार्यालये, ग्रामपंचायती इत्यादी व्दारे आयोजित करण्यात येणारे सार्वजनिक तथा शासकीय समारंभामध्ये मान्यवरांच्या स्वागतासाठी किंवा सन्माननीय लोकप्रतिनिधी, अधिकारी यांच्या स्वागतासाठी बुकेऐवजी शालेय विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी उपयोगी ठरणारे शालेय साहित्य (उदा. वह्या, पेन, पेन्सिल, ड्रॉइंग साहित्य इ.), ज्ञानवर्धक पुस्तके (विशेषतः मुलांसाठी वा वाचनालयासाठी उपयुक्त), फळझाडांची रोपे, (उदा. आंबा, सिताफळ, आवळा, चिंच इ.) फूल रोपे या प्रकारचे साहित्य देण्या घेण्याची पध्दत ठेवण्याचे आवाहन या परिपत्रकातून करण्यात आले आहे.ही कृती फक्त स्वागतापुरती मर्यादित नसून सामाजिक जबाबदारी म्हणूनही अंगीकारावी. अशा पध्दतीमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत व प्रोत्साहन आणि वृक्षलागवडीला चालना देऊन हरित जिल्हा घडविण्याचा उद्देश असल्याचे सदर परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्हापरिषदेच्या कार्यक्रमात आता फुलांच्या बुक्यांना पूर्णविराम मिळणार आहे.

**सिईओ संजिता मोहपात्रा यांनी काढले परिपत्रक**


विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत व प्रोत्साहन आणि वृक्षलागवडीला चालना देऊन हरित जिल्हा घडविण्याचा उद्देशाने सीईओ संजिता मोहपात्रा यांनी परिपत्रक काढले.

# शहरातील हवेत 'आरएसपीएम' समाधानकारक

## नायट्रोजन, सल्फर डाय ऑक्साईडचे प्रमाण ११.५५, १५.९४ मायक्रोग्रॅम पर क्यु.मीटर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

सुमारे ८ लाख लोकसंख्या व १२१.६५ चौ. कि.मी. क्षेत्रफळ असलेल्या शहरातील हवेत आरएसपीएमचे (रिस्पायरेबल सस्पेंडेड पार्टीक्युलेट मॅटर) प्रमाण हे ६९.४८ मायक्रोग्रॅम पर क्युबिक मीटर, असे समाधानकारक असल्याची माहिती महानगर पालिकेचे पर्यावरण अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख यांनी दिली. याबाबत ॲम्बियन्ट एअर क्वालिटी मॉनिटरिंगनेही (एएक्युएम) जारी केलेली आकडेवारी समाधानकारक असुन शहरातील हवा २०२३-२४ च्या तुलनेत २०२४-२५ मध्ये ३ आरएसपीएमने शुद्ध असल्याचे म्हटले आहे.



शहरातील हवेत नायट्रोजनडाय ऑक्साईचे प्रमाण ११.५५ टक्के तसेच सल्फरडाय ऑक्साईडचे प्रमाण १५.९४ मायक्रोग्रॅम पर क्युबिक मीटर असल्यामुळे हवेची शुद्धता वाढली आहे. यासाठी शहरातील हिरवळ तसेच विविध ठिकाणी असलेले ग्रीन पॉकेट्स कारणीभूत आहेत. कोणत्याही शहरातील हवा प्रदूषणाचे सरासरी प्रमाण हे जर १०० मायक्रोग्रॅम पर क्युबिक मीटरपेक्षा कमी असेल तर ते समाधानकारक श्रेणीत येते. शहरात वायू व ध्वनी प्रदूषण कमी करण्यासाठी काही विशेष क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. वायू प्रदूषण नियंत्रित ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्यात आली.

### वृक्षलागवडीला प्रोत्साहनासाठी नि:शुल्क रोपट्यांचे केले वितरण

महापालिकेने शहरातील हवेची शुद्धता कायम राखण्यासाठी लोकसहभाग मिळावा या उद्देशाने गेल्या वर्षी ३५ हजार विविध प्रजातींच्या रोपट्यांचे नि:शुल्क वितरण केले. त्यांचे पालकत्व नागरिकांनी स्वीकारल्यामुळे सध्या त्यांचे उत्तमप्रकारे संवर्धन होत आहे. शहरातील प्रत्येक व्यक्तीने जास्तीत जास्त संख्येत वृक्षारोपण करावे.


**महेश देशमुख, पर्यावरण अधिकारी, मनपा.**

# ३८४ शिक्षकांवर टांगती तलवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

जिल्हापरिषद अंतर्गत जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये १५ जून २०२४ च्या संचमान्यतेनुसार शिक्षकांना ३८४ अतिरिक्त ठरविण्याची कार्यवाही सुरू झाली आहे. हे शिक्षक अतिरिक्त ठरल्यास ग्रामीण भागातील शाळा शिक्षकांअभावी बंद पडण्याची गंभीर परिस्थिती निर्माण होणार असल्याचा आरोप करीत जिल्ह्यातील शेकडो शिक्षकांनी मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली.

यापूर्वी अंमलात असलेली २८ ऑगस्ट २०१५ ची संचमान्यता शासन निर्णयानुसार इयत्ता सहावी, सातवी व आठवीमध्ये २० पेक्षा कमी पटसंख्या असतानाही विज्ञान, गणितासाठी एक तसेच भाषा विषयासाठी एक, अशी दोन शिक्षकांची पदे मंजूर करण्यात येत होती; परंतु १५ मार्च २०१४ च्या शासन निर्णयानुसार २० पेक्षा कमीपटसंख्या असणाऱ्या महाराष्ट्रातील अशा सर्वच शाळांमध्ये केवळ एकच पदवीधर शिक्षकाचे पद मान्य



करण्यात आले आहे.

यामुळे अमरावती जिल्हापरिषद अंतर्गत १४ ही तालुक्यांमध्ये ३८४ पेक्षा जास्त शिक्षकांना अतिरिक्त ठरवून ग्रामीण भागातील शाळा विद्यार्थ्यांअभावी बंद पडण्याची भीती शिक्षक संघटनांनी व्यक्त केली आहे.

यावेळी अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य उपाध्यक्ष किरण पाटील, शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष मंगेश खेरडे, शिक्षक संघाचे जिल्हा सरचिटणीस सुभाष सहारे, उपाध्यक्ष मनोज चौरपगार, ज्येष्ठ नेते राजाभाऊ होले, शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष प्रभाकर झोड, जिल्हा सरचिटणीस संदीप देशमुख, महाराष्ट्र प्राथमिक संघाचे (संभाजी थोरात गट) जिल्हाध्यक्ष अजय साव, जिल्हा सरचिटणीस गणेश भगत, बहुजन शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष विनोद खाकसे, सरचिटणीस नितीन कांबळे, शिक्षक भारतीचे जिल्हा संघटक दत्तप्रसाद भेले, डॉ. ज्ञानेश्वर मोहोड, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ(शिवाजीराव पाटील) जिल्हाध्यक्ष सुंद्र मेटे, जिल्हा सरचिटणीस राजकुमार खर्चान, शिक्षक परिषदेचे विभागीय नेते सुनील केने, चेतवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष सतेंद्र अभ्यंकर, गजानन अभ्यंकर, देवेंद्र खैर, दिनेश साबळे आदी उपस्थित होते.

# परवानगी नसतांना कसा सुरू राहते हो साहेब रात्री २ पर्यंत ढाबा! बायपास, हायवे थांबा तेथे ढाबे, दारूचा महापूर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५बडनेरा**

येथील मोठ्या प्रमाणात बायपास तसेच हायवे हॉटेल तसेच धाब्याची संख्या असून सध्यस्थितीत हॉटेलमध्ये जाऊन जेवण करण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले. त्यामुळे वाटेल तेथे हॉटेल व ढाबे सुरू झाले आहे; परंतु या हॉटेल वाल्यांनी अन्न प्रशासन तसेच शासनाकडून कोणत्याच प्रकारची परमिशन नसल्यामुळे ढाबे सर्रास रात्री दोनपर्यंत सुरू राहतात. यामध्ये रात्री धाब्यावर देरू पिऊन जेवण करतात.



दारू पिण्याची धाब्यावर कोणत्याच प्रकारचे परवानगी नसतानासुद्धा ढाबा मालक दारूची सोय उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी उपयुक्त असणाऱ्या या घटनेकडे पोलिस प्रशासन बघ्याची भूमिका घेतात.बडनेरा बायपास तसेच राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणात हॉटेल ढाबे असून यावर खुल्या मटणाच्या तसेच दारूच्या पार्ष्या जोरात होतात. अमरावतीहून तसेच दुरून लोक बडनेरा येथील ढाब्यावर ताव मारण्यासाठी येतात. बार बंद झाले तरी ढाब्यावर दारू उपलब्ध करून देण्यात येते.


रस्त्यावरील ढाबे, हॉटेल तपासणी कमी कधीच न केल्यामुळे हॉटेल ढाब्यावर दूषित पाणी आणि उपहारगृहाची तपासणी करणे गरजेचे आहे; परंतु प्रशासन विभाग याकडे दुर्लक्ष केल्या जात आहे. मोजक्याच व्यवसाय लोकांकडे परवाने आहेत.रात्री उशिरा चालणाऱ्या हॉटेल वढाब्यावर दारू पिणाऱ्यांवर कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी कारवाई करण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली जात आहे. याकडे विशेष पोलिस आयुक्तांनी लक्ष द्यावे, अशी मागणी केली जात आहे.

# जिल्हा परिषदेत 'आस्थापना दिनाची' लगबग : दोन दिवसानंतर कळणार किती तक्रारींचा झाला निपटारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

एक अभिनव उपक्रम म्हणून जिल्हा परिषद प्रशासनाने आजपासून 'आस्थापना दिन' पाळणे सुरु केले आहे. येथून पुढे दर महिन्याच्या पहिल्या बुधवारी हा दिवस पाळला जाईल. त्यामुळे आज दिवसभर बहुतेक विभागात आस्थापना दिनाची लगबग दिसून आली.या दरम्यान नेमका किती प्रकरणांचा निपटारा झाला, हे येत्या दोन दिवसांत कळणार आहे.

जिल्हा परिषद प्रशासनाने हा दिवस आखून दिला असल्याने त्यादिवशी सर्व विभागातील सर्व



प्रमुख अधिकारी व कर्मचारी आवर्जून उपस्थित राहतात. परिणामी सर्वांना एकाचवेळी एक-दुसऱ्यांशी संवाद साधणे सहज शक्य होते.

या संवादाच्या माध्यमातून बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित राहिलेल्या प्रकरणांवर चर्चा करणे व त्याचवेळी अंतिम निर्णयाप्रत येणे शक्य होते. हा उपक्रम सुरु करण्यामागचा उद्देशही तोच आहे. सीइओ संजीता महापात्र यांनी हा उपक्रम सुरु केला आहे.

या उपक्रमानिमित्त आज विविध विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी एकत्र बसून बरीच प्रलंबित प्रकरणे निकाली काढली. याचा एकत्रित अहवाल येत्या दोन दिवसांत स्पष्ट होणार आहे.कर्मचारी संघटनेतर्फे १० डझन नोटबुक स्वागताला हार-तुरे न आणता शालेपयोगी साहित्य द्या, अशा सूचना सीइओ संजीता महापात्र यांनी रुजू झाल्यानंतर लगेच दिल्या होत्या. त्या सूचनेनुसार गोळा झालेले साहित्य मेळघाट आणि जिल्हा परिषदेच्या इतर शाळांमधील गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आले.दरम्यान बुधवारी पुन्हा जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेने १० डझन नोटबुक सीइओंच्या स्वाधीन केले.

# अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला एनएमसीची नोटीस

## पायाभूत सुविधा, शिक्षक कमतरतेवर ठेवले बोट

अरुण जोशी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

मागील वर्षी सुरु झालेल्या अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग म्हणजेच एनएमसीने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. महाविद्यालयामध्ये उपलब्ध पायाभूत सुविधा व शिक्षकांची रिक्त पदे यावर बोट ठेवत नाराजी व्यक्त केली आहे. अर्थात वर्षभरातच नव्यानं सुरु झालेल्या वैद्यकीय महाविद्यालयाला नोटीस बजावण्यात आली आहे.

अमरावती येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास मान्यता मिळाल्यानंतर मागील वर्षी म्हणजे ऑक्टोम्बरमध्ये महाविद्यालयाचे उद्घाटन झाले आहे. यास मान्यता मिळाल्यानंतर जवळपास ४५० पदांची भरती करण्यास मंजुरी मिळाली आहे. मात्र याठिकाणी अद्याप पुरेशी पदभरती झालेली नाही. परिणामी याठिकाणी अपूर्णता जाणवून येत असल्याचे एनएमसीच्या पाहणीत दिसून आले आहे.

**राज्यातील सर्व महाविद्यालयांची पाहणी**

राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधांची तपासणी नुकताच महाराष्ट्र आयुर्वेद विज्ञान विद्यापीठाच्या पथकाकडून करण्यात आली आहे. या पथकांनी सादर केलेल्या अहवालात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमधील पायाभूत सुविधांसह अन्य सर्व प्रकारच्या सुविधांची पाहणी करण्यात आली आहे. या मध्ये मोठी कमतरता दिसून आली होती. अर्थात एनएमसीने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे महाविद्यालयात सुविधा असणे अपेक्षित आहे.

**तात्काळ भरतीचे आदेश**

शिवाय निकषाच्या तुलनेत ५० टक्के पेक्षा कमी शिक्षक वर्ग उपलब्ध असल्याचा धक्कादायक निष्कर्ष अमरावतीच्या मेडिकल कॉलेजमध्ये पुढे आला आहे. त्यामुळे आयोगाने मेंटेनन्स ऑफ स्टँडर्ड मेडिकल एज्युकेशन रेगुलेशन २०२३ च्या कलम आठचा वापर करून नोटीस बजावले आहे. शिवाय तात्काळ शिक्षकांची भरती प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश सुद्धा दिले आहे.

# 'अपात्र बहिणींवर कारवाई केली तर...', माजी मंत्र्यांचा सरकारला इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

लाडकी बहीण योजनेवर अनेक टीका होताना दिसत आहे. विरोधकांकडून लाडक्या बहिणींची फसवणूक होत असल्याचे बोलले जात आहे. लाडकी बहीण योजनेतून आता ५० लाख महिला अपात्र केल्याचा आरोप दिला जात आहे. त्यावर आता प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडून यांनी टीका केली आहे. लाडक्या बहिणींची फसवणूक होत आहे आम्ही न्यायालयात जाऊ, असं त्यांनी म्हटलं आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना ५० लाखापेक्षा जास्त महिला अपात्र केल्याचा आरोप केला जात आहे..ही सगळी लाडक्या बहिणींची फसवणूक आहे या विरोधात आम्ही कोर्टात पण जाणार आहे, निवडणुकीत पात्र अपात्र न पाहता मतं घेण्यासाठी केलेला हा प्रकार आहे. एकदा पात्र-अपात्रची सर्व कारवाई झाली की तेव्हा अपात्र महिलांना सोबत घेऊन आम्ही कोर्टात जाऊ.अपात्र महिलांना लाभ दिला कसा दिला असेल तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. तर एकदा सरकारने अपात्र पात्र याची यादी दिल्यावर आम्ही कोर्टात जाऊ असं वक्तव्य बच्चू कडू यांनी केलं.

**लाडकी बहीण योजनेवर विरोधकांची टीका**

लाडकी बहीण योजनेवर विरोधी पक्ष नेहमीच टीका करतात. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचे आश्वासन देऊन त्यांना पैसे दिले नाही, त्यांची फसवणूक केली जात आहे, असं विरोधी पक्षांनी म्हटलं आहे. लाडकी बहीण योजना बंद होईल, असंही अनेकांनी म्हटलं आहे. मात्र, लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, असं स्वतः मंत्री आदिती तटकरेंनी सांगितलं आहे.

# अधिक दराने मुद्रांक विकत असल्यास इथे करा थेट तक्रार




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नागपूर**


दर्शनीय किमतीपेक्षा अधिक रक्कमेची मागणी मुद्रांक विक्रेते करत असल्यास त्याबाबत थेट तक्रार करण्याचे आवाहन मुद्रांक विभागाकडून करण्यात आले आहे. यासंदर्भात लोकमतने वृत्त प्रकाशित करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते, हे विशेष.

ही तक्रार सहजिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, नागपूर शहर कार्यालय ए-विंग, ३ रा माळा, नवीन प्रशासकीय इमारत क्र. २, विभागीय आयुक्त कार्यालय परिसर, सिव्हिल लाइन्स, नागपूर यांच्याकडे थेट सादर करावी. संबंधित मुद्रांक विक्रेता यांच्यावर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करता येईल तसेच मुद्रांक विक्री करताना होणाऱ्या गैरवर्तवणुकीला आळा घालणे शक्य होईल, असे मुद्रांक विभागाकडून कळविण्यात आले आहे.

महसूल व वन विभाग यांच्या आदेशानुसार जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, वास्तव्य प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्याकरिता तसेच शासकीय कार्यालये, न्यायालये यांचेसमोर दाखल करावयाच्या इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर आकारणी योग्य मुद्रांक शुल्क माफ केलेले आहे. काही शासकीय कार्यालयांमध्ये मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र सादर करण्याबाबत आग्रह धरतात. त्यामुळे शासकीय कार्यालयांनी सर्व सामान्य नागरिकांना मुद्रांकावर प्रतिज्ञापत्राची मागणी करून नागरिकांना वेठीस धरू नये, असे आवाहन मुद्रांक जिल्हाधिकारी (नागपूर शहर) संजय तरासे यांनी केले आहे.

# मोबाइल नेटवर्कमध्ये अडथळे; नागरिक, व्यावसायिक त्रस्त

## कॉल ड्रॉप आणि नेटवर्क समस्या वाढल्या : त्वरित सुधारणा आवश्यक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

मागील काही दिवसांपासून शहरासह परिसरातील विविध मोबाइल कंपन्यांचे नेटवर्क वारंवार अचानक कट होत असल्याच्या तक्रारी ग्राहकांकडून वाढत आहेत. सध्याच्या काळात मोबाइल आणि इंटरनेट सेवा ही जीवनातील अत्यावश्यक गरज बनली असून, नेटवर्क न मिळाल्यामुळे नागरिकांचे दैनंदिन कामकाज प्रभावित होत आहे.

डिजिटल सेवा पुरवणारी दुकाने, शेतकरी, विद्यार्थी तसेच सामान्य नागरिक नेटवर्कअभावी अनेक अडचणींना सामोरे जात आहेत. या नेटवर्क समस्येमुळे व्यवसायाला मोठा धोका निर्माण होत असून, प्रशासनाने तातडीने समस्या सोडवण्यासाठी आवश्यक पावले उचलावी, अशी मागणी ग्राहकांकडून करण्यात येत आहे.

**ऑनलाइन सेवांचा खोळंबा**


मोबाइल नेटवर्कच्या विस्कळीतपणामुळे ग्राहकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. आज मोबाइल हा प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. त्यामुळे नेटवर्क न मिळाल्यास अत्यावश्यक कामे व्यवस्थित होऊ शकत नाहीत. सध्या बँकिंग, पोस्ट, कंपन्या आणि इतर कार्यालयीन कामे बहुतेक ऑनलाइन स्वरूपात पार पडत आहेत. अशावेळी नेटवर्कमध्ये तांत्रिक अडचणी आल्याने महत्त्वाची कामे ठप्प पडत आहेत.

**पैसे मोजूनही सेवेपासून वंचित**

मोबाइल नेटवर्कच्या समस्यांबाबत तक्रारींची संख्या वाढली आहे. विविध कंपन्यांच्या नेटवर्कमध्ये अचानक कट होणे, फोनवर संभाषणादरम्यान आवाज ऐकू न येणे आणि कॉल ड्रॉप होणे यासारख्या त्रासदायक समस्या वाढल्या आहेत. ग्राहकांना महिन्याकाठी भरमसाठ शुल्क भरावे लागते, पण त्यांना अपेक्षित दर्जाची सेवा मिळत नाही. अनेकांना संपर्क साधताना गंभीर अडचणींचा सामना करावा लागत असून, काही भागांत ही समस्या अधिक गंभीर स्वरूप धारण करत आहे.

# गॅस परवडेना, सरपणासाठी धरली जंगलाची वाट! योजनेचा बोजवारा : महिलांचे नियोजन ढासळले

## ९१४ रुपयात मिळणारा गॅस सिलिंडबही आता परवडेनासा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ मेळघाट**

घरगुती गॅस सिलिंडर आता स्वयंपाक घरातील एक अविभाज्य घटक बनला आहे. काही वर्षांपासून गैस सिलिंडरच्या भावात सतत वाढ होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील गोरगरीब जनता उस्त झाली आहे. गैस सिलिंडरचे कढ़ते दर सर्वसामान्याना पेलवत नसल्याने ग्रामीण महिलांनी पुन्हा शेत, जंगलाची वाट धरली आहे.

महिलांना उन्हातान्हात वणवण करत स्वयंपाकासाठी सरपण मिळविण्यासाठी शोधाशीच करावी लागत आहे वाढती महागाई आणि गैस दरवाढीने सर्वसामान्यांसह गरीब कुटुंबातील महिलांचे नियोजन बासळले आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या दरात वाढ होत असल्याने गोरगरिबांची पंचाईत झाली आहे. घरगुती गॅस सिलिंडरची किंमत वाढली आहे. या किंमती व्यतिरिक्त गाडीभाडेही द्यावे लागत आहे. त्यातच गॅसची सबसिडीही बंद झाली आहे.योजनेचा मूळ उद्देश बाजूला पडला आहे. गॅस दरवाढीने कधीच मागे वळून पाहिले नाही. सिलिंडरच्या वाढत्या किमतीमुळे मोलमजुरी करणाऱ्यांना गॅसवर स्वयंपाक करणे आता परवडेनासे इगले आहे. ग्रामीण भागातील हातावर पौट असणाऱ्या गरिबांना, कष्टकरी महिलांना या सिलिंडरची किंमत परतडत नसल्याने ग्रामीण भागातील महिला पुन्हा चुलीकडे वळल्याचे दिसून येत आहे.

**भाववाढ आवाक्याबाहेर बाई, आपली चुलंच बरी**

शासनाने उज्वला गॅस योजना आणून गरीब कुटुंबांना स्वस्तात गॅस कनेक्शन उपलब्ध करून दिले. त्यामुळे चुलीवर शिजणारा स्वयंपाक शक्य तितक्या लवकर गॅसवर होऊ लागला, अनेक गावेही धूरमुक्त झाली. मात्र, सिलिंडरची भाववाढ आवाक्याबाहेर गेल्याने गरीब कुटुंबांना एकदा संपलेले मिलिडर घेण्यासाठी पैसे आणायचे कुठून, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे बाई आपली चुलंच बरी अशी भावना गरीब कुटुंबातील महिलांची झाली आहे.

**महागाईमुळे सर्वसामान्य मेटाकुटीस**

दिवसेंदिवस वाढत्या महागाईने अनेक वर्षातील उच्चांक गाठला आहे. जणू काही देशात महागाईचा आगडोंब उसळला आहे. परिणामी, मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या मजुरांचे जीवन जगणे महागाईमुळे आणखीनच संकटात सापडले आहे. घरगुती सिलिंडर, इंधन दरवाढीसह सर्वच जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडले आहेत. त्यामुळे संसाराचा गाडा हाकायचा कसा, असा प्रश्न गीरगरिबांसह शेतकऱ्यांना पडला आहे.

# राजस्थानमधील बोगस खत महाराष्ट्रात, नामांकित कंपनीच्या नावावर बनावट रासायनिक खत विक्री



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अकोला**

राजस्थानमधील बोगस व बनावट रासायनिक खत आणून ते महाराष्ट्रात नामांकित कंपनीच्या नावावर विक्री करीत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. वाशीम कृषी विभागाने बनावट रासायनिक खताच्या साठवणुकीचा पर्दाफाश करीत मोठी कारवाई केली. या कारवाईत नऊ लाख पाच हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी दिनेश चव्हाण नावाच्या एका व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाशीम जिल्ह्याच्या मानोरा तालुक्यातील कारपा येथे जिल्हा गुणवत्ता नियंत्रण भरारी पथकाने छापा टाकला. छाप्यात कुठलाही मजकूर नसलेल्या ३३० खताच्या रिकाम्या गोण्या आणि नामांकित खत कंपनीचा मजकूर छापलेल्या २७० गोण्या असा एकूण ६०० गोण्यांचा साठा आढळून आला. संशयित साठवणूकदार दिनेश चव्हाण यांची चौकशी केली असता, त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली नाहीत आणि कोणताही विक्री परवाना सादर केला नाही. संबंधित व्यक्ती साध्या बनावट गोण्यांमधील खत नामांकित ब्रँडेड खत कंपनीच्या गोण्यांमध्ये पॅक करत होता. हे बनावट खत राजस्थानमधील येथून आणल्याचे त्यांच्याकडून मिळालेल्या देयकावरून समोर आले. देयकावर साठा ताब्यात असलेल्या कोणत्याही व्यक्तीचे किंवा आस्थापनेचे नाव किंवा स्वाक्षरी नव्हती. त्यामुळे खत साठा अवैध आणि बोगस असल्याच्या संशयाला दुजोरा मिळाला.

संशयित आरोपी बनावट खत आयात केलेले खत म्हणून विक्त असल्याचे दिसून आले. त्याने सादर केलेल्या देयकानुसार, हे खत केवळ २.५० रुपये प्रति किलोग्राम इतक्या कमी किमतीत खरेदी केले होते. आरोपीने केवळ १५० रुपये प्रति गोणी किमतीच्या गोणीवर १४७० रुपये प्रति गोणी किंमत छापून जवळपास आठ लाख ८२ हजार रुपयांची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला.

# पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आव्हानाला जिल्हा प्रशासनाचा उस्फूर्त प्रतिसाद

## एक पेड माँ के नाम उपक्रम अंतर्गत संपूर्ण जिल्ह्यात वृक्षारोपण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ५ अमरावती**

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त जिल्ह्यातील प्रत्येकाने आपल्या घरासमोर आईच्या नावाने एक झाड लावण्याचे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. या पार्श्वभूमीवर आज जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी 'एक पेड माँ के नाम' अंतर्गत त्यांच्या आईच्या नावे पिंपळाचे रोप लावून वृक्षारोपण केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण केले. यावेळेला अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दाणे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार , उपजिल्हाधिकारी श्री विवेक जाधव , पालकमंत्री यांचे स्वीय सहा. विपीन पिसे आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

'एक पेड माँ के नाम' उपक्रमात जिल्हा प्रशासनासह स्थानिक स्वयंसेवी संस्था , विद्यार्थी, सर्व शासकीय विभागातील अधिकारी , कर्मचारी यांनी सहभाग घ्यावा. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पर्यावरण दिना निमित्त 'एक पेड माँ के नाम' हे अभियान राबविण्याबाबत प्रशासनाला सूचना दिल्या. जिल्ह्याचा औद्योगिक विकास होत असताना पर्यावरणाचे संतुलन ढळू नये यासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

जागतिक पर्यावरण दिनाच्या औचित्याने प्रत्येकाने आपली सामाजिक जबाबदारी म्हणून आपल्या घराच्या आवारात एक रोप लावावे. प्रत्येक शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्याने वृक्षारोपण कार्यक्रम राबवावा. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत १५ ऑगस्टपर्यंत उद्दिष्ट ठेवून वृक्षारोपण ड्राईव्ह कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्याबाबत वेळोवेळी आढावा घेऊन सद्यस्थिती जाणून घेण्यात येणार आहे. वृक्षारोपणाचे महत्त्व जाणून प्रत्येकाने यात स्वयंस्फूर्तीने सहभाग घ्यावा. येणाऱ्या पिढीला आपल्याला संतुलित पृथ्वीचा वारसा सोपवायचा आहे, असे जिल्हाधिकारी श्री. येरेकर यावेळी म्हणाले. यावेळी तहसिलदार, उप विभागीय अधिकारी , जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी , कर्मचारी उपस्थित होते.

